पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

॥गणपती बाप्पा मोरया॥

अकोला • वर्ष १६ • अंक ६९ • सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

बाप्पा आले

















# 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात अकोला नगरी दुमदुमली

## उत्साहात आणि दिमाखात विघ्नहर्त्याचे आगमन

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला :** 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया...' च्या गजरात, ढोल-ताशांचा निनाद, गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतषबाजी करत लाडक्या विघ्नहर्ता बाप्पांचे अत्यंत दिमाखात आगमन झाले. भाद्रपद चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर वर्षभराची प्रतीक्षा संपवून गणरायाची घरोघरी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये भक्तिमय वातावरणात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या आगमनामुळे संपूर्ण अकोला नगरी चैतन्य आणि भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली आहे.

बाप्पाला घरी आणण्यासाठी गणेशभक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. शहरातील क्रिकेट क्लब मैदानावर काल रात्रीपासूनच गणेशमूर्ती खरेदीसाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. मैदानासह शहरातील विविध भागांत लावण्यात आलेल्या छोट्या आणि आकर्षक बाप्पांच्या विक्री केंद्रांवर लहान-मोठ्यांची मोठी रांग दिसून आली.विशेषतः चिमुकल्या भक्तांमधील आनंद पाहण्यासारखा होता.

अनेक लहान मुलांनी अत्यंत श्रद्धेने आणि उत्साहाने स्वतःच्या नाजूक डोक्यावर बाप्पाची मूर्ती बाळगून 'बाप्पा मोरया'चा जप करत घरी नेल्याचे विलोभनीय दृश्य ठिकठिकाणी पाहायला मिळाले.

रात्रीतून सिंधी बांधवांनीही मोठ्या संख्येने आणि उत्साहाने गणपती मूर्तींची खरेदी करून बाप्पांचे जंगी स्वागत केले. बाप्पाच्या स्वागताच्या तयारीसाठी बाजारपेठेतही मोठी उलाढाल झाली. पूजेचे साहित्य, ताजी दुर्वा, सुगंधी फुले, मखमली हार आणि बाप्पाच्या आवडीचा मोदक-प्रसाद खरेदी करण्यासाठी मुख्य बाजारपेठेत भाविकांची अलोट गर्दी जमली होती. पोलीस प्रशासनाने तातडीने रस्त्यावर उतरून वाहतूक सुरळीत करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.एकंदरीत, विघ्नहर्त्याच्या या मंगलमयी आगमनाने अकोलेकरांच्या आयुष्यात नवी ऊर्जा आणि समृद्धीचे वातावरण निर्माण केले आहे. आता पुढील दहा दिवस संपूर्ण अकोला शहर बाप्पाच्या भक्तीत आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांत पूर्णपणे लीन होणार आहे.

### भव्य मिरवणुका आणि शहरातील वाहतूक कोंडी

एकीकडे घरगुती गणपतींचे अत्यंत शांततेत आणि भाविक वातावरणात आगमन होत असताना, दुसरीकडे शहरातील मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी दिंडी, ढोल-ताशांच्या तालावर भव्य मिरवणुका काढून बाप्पाचे भव्य स्वागत केले. गुलालाच्या उधळणीने संपूर्ण रस्ते रंगीबेरंगी झाले होते.या भव्य मिरवणुकीमुळे शहरातील टॉवर चौक, जठारपेठ चौक, तुकाराम चौक, डाबकी रोड आणि सिंधी कॅम्प या प्रमुख भागांमध्ये काही वेळेसाठी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. मात्र, बाप्पाच्या स्वागताचा उत्साह इतका प्रचंड होता की, वाहतूक कोंडीत अडकूनही नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद कमी झाला नाही.

# सगळे नाही, एकटाच मुंबईला येतोय!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**जालना :** मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाची दिशा स्पष्ट करत मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा करत मराठा समाजाला मोठ्या संख्येनी मुंबईला येण्याचे आवाहन आधी केले होते. मात्र, आता मनोज जरांगे यांनी १४ सप्टेंबरला पत्रकार परिषदेत बोलताना आणखी एक मोठी घोषणा केली आहे. सगळे नाही, तर मी एकटाच मुंबईला येतोय, आता सरकार कशी परवानगी देत नाहीत तेच बघतो, असे मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाची रणनीती बदलत मोठा निर्णय जाहीर केला आहे. ठरलेल्या मार्गाने मी उद्या अंतरवालीतून मुंबईसाठी निघणार आहे. मात्र यावेळी एक मोठा बदल म्हणजे मी एकटाच निघणार आहे. माझ्यासोबत केवळ दोन गाड्या आणि दोन रुग्णवाहिका असतील, असे सांगत, आता मी एकटा येणार असेल तर आता सरकार मला परवानगी देणार की नाही, असा थेट सवाल त्यांनी राज्य सरकारला विचारला आहे. आंदोलकांना शांत राहण्याचे आवाहन करताना जरांगे पाटील म्हणाले, मी मागे हटलेलो नाही, मी खिंड लढवतो आहे. आधी मला रस्त्यावरचे काटे काढू द्या. मी पुढे जातोय, तुम्ही तुमची ताकद वाढवा. ज्या आंदोलकांनी गाड्या आणि वर्गणी जमा केली आहे.

# विद्यापीठात भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाईस टाळाटाळ!

## न्यायालयाने १७ सप्टेंबरपर्यंत दिला अंतरिम दिलासा

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला:** शासकीय कार्यालयातून एक-दोन नव्हे, तर महत्त्वाच्या अनेक फाईलींचा रहस्यमयरीत्या गायब होण्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर संपूर्ण अकोल्यात भ्रष्टाचाराच्या संशयाची मोठी लाट उसळली आहे. प्रशासनाच्या नाकाखाली चाललेल्या या कथित घोटाळ्याने सर्वांचेच डोके चक्रावून सोडले आहे. कृषी विद्यापीठाच्या लाखो रुपयांच्या घोटाळ्या संशयित आरोपी डॉ. शामसुंदर माने, हंसराज राठोड आणि मोरे यांना न्यायालयाने १७ सप्टेंबरपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. तूर्तास या तिघांना अटकेपासून तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी कायद्याचा फास आता कोणाच्या मानेभोवती आवळणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, कृषी विद्यापीठाच्या शिवार फेरीत यापैकी काही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार असून त्यांची निवड कुठल्या आधारावर केल्या गेली असा प्रश्न विचारला जात आहे. कृषी विद्यापीठाने गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधितांवर काय कारवाई केली हा प्रश्न अनुत्तरीत आहे. तर मध्यवर्ती संशोधन केंद्रावरील सिमेंट फॅक्टरी गुंडाळण्याचे आदेश दिले असून डॉ.शिवाजीराव नागपूरे यांच्यावर कारवाई मात्र टळल्या जात असल्याचे चित्र आहे.

पोलीस आपल्या मुसक्या आवळणार या भीतीने हादरलेल्या डॉ. माने, हंसराज राठोड आणि मोरे यांनी तडकाफडकी न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज ठोकल. न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना १७ सप्टेंबरपर्यंत अंतरिम संरक्षण मिळाले असले, तरी ही केवळ वादळापूर्वीची शांतता मानली जात आहे. आता सर्वांच्या नजरा १७ सप्टेंबरच्या पुढील सुनावणीकडे लागल्या आहेत. गायब फाईलींचा माग काढण्यासाठी आणि यामागील मुख्य सूत्रधारांचा बुरखा फाडण्यासाठी पोलीस आरोपींच्या कस्टडीची (पोलीस कोठडी) जोरदार मागणी करणार का? तपासाची चक्राकार दिशा कोणत्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

जर पोलिसांनी न्यायालयात सबळ पुरावे आणि तपासाची गरज मांडली, तर या तिघांचे अंतरिम संरक्षण छत्र गळून पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. १७ सप्टेंबर रोजी न्यायालयाचा हातोडा कोणावर पडणार आणि पोलीस प्रशासन या घोटाळेबाजांची कशी नाकाबंदी करणार, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

### गायब फाईलींमागे भ्रष्टाचाराचे मोठे रॅकेट?

कार्यालयातील अत्यंत गोपनीय आणि संवेदनशील फाईली नेमक्या गायब झाल्या की जाणीवपूर्वक पळवण्यात आल्या? या फाईली पळवण्यामागे कोणाचे 'आशीर्वाद' आहेत? आणि गायब झालेल्या कागदपत्रांच्या आधारे भ्रष्टाचाराची कोणती काळी कृत्ये दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे? असे जळजळीत प्रश्न आता उपस्थित होत आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, हा केवळ निष्काळजीपणा नसून मोठ्या भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्याचा पद्धतशीर कट असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.





बाप्पा आले













सिटी न्यूज सुपरफास्ट संमिश्र
२
सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

## हिवरखेडमध्ये गणेश उत्सव व हरतालिका आनंदात साजरा

**हिवरखेड :** येथे मोठ्या उत्साहाने महिला भाविकांन कडून हरतालिका हे व्रत उत्साहात साजरे करण्यात येत आहे तर याच बरोबर आज आपल्या लाडक्या गणरायाच्या आगमनाची जोरदार तयारी सुद्धा केली जात आहे, दोन्ही उत्सव प्रत्येक वर्षी मागे पुढे येतात मात्र यावर्षी सोबत आल्याने महिला भाविकान बरोबर पुरुष भाविकांची कामे अधिक जास्त वाढली हा उत्सव आनंदात



चोहिकडे साजरा होत असल्याचे दिसून येत आहे बाल भक्त सुद्धा गणरायाच्या तयारीत रमले तर तरुणी वनस्पती गोळा करण्यात रमल्याचे चित्र दिसत आहे.

# जिल्ह्यात दुष्काळसदृश स्थिती; उत्पादनात 50 टक्के घट!

## खरिपातील पिकांचा अहवाल कृषी आयुक्तांना सादर

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला :** जिल्ह्यातील सात तालुक्यातील ३३ महसूल मंडळात सलग २१ दिवस पावसाचा खंड पडला आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट पसरल्याने खरीप पिकांची पाहणी करण्यात आली. या पाहणीमध्ये पिकांची वाढ खुंटणे, सुकणे, पाते-फूल गळणे, शेंगा न भरणे यासह विविध रोगांचा प्रार्दुभाव आढळून आला आहे. यामुळे उत्पादनात ५० टक्के घट होण्याचा अंदाज जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या बैठकीत वर्तविण्यात आला आहे. या संदर्भात १० सप्टेंबर रोजी जिल्हा प्रशासनाने कृषी आयुक्त पुणे यांना सादर केला आहे. यंदा जिल्ह्यात ४ लाख २६ हजार ६६९ हेक्टरवर खरीप पिकांची लागवड करण्यात आली असून यात कपाशी १ लाख ६३ हजार २५५ हे., सोयाबीन १ लाख ९९ हजार ७९३ हे., तूर ५७ हजार ४७४ हे., मूग ७७५ हे. आणि उडीद ५८४ हे. आदी प्रमुख पिकांचा समावेश आहे.

मात्र सातही तालुक्यातील ३३ मंडळात सलग २१ दिवस पावसाचा खंड पडल्याने पिकांची स्थिती अत्यंत बिकट असून पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. त्या पृष्ठभूमीवर जिल्हाधिकारी



कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली ९ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक पार पडली. त्यात खरीप पीक परिस्थिती, पाणी टंचाई याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी जिल्ह्यातील पीक परिस्थितीची माहिती सादर केली. तसेच पीक परिस्थितीबाबत विश्लेषण व अहवाल शासनाला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आला. आता शासन स्तरावर काय निर्णय होतो, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

### सलग २१ दिवस पावसाचा खंड असलेले मंडळे

ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान सात तालुक्यातील ३३ महसूल मंडळामध्ये २१ दिवसांच्या वर पावसाचा खंड दिसून येत आहे. यामध्ये आकोट तालुक्यातील मुंडगाव, पणज, आसेगाव, चोहट्टा. तेल्हारामधील पाथर्डी, पंचगव्हाण, हिवरखेड. बाळापूर तालुक्यातील पारस, व्याळा, वाडेगाव, उरळ. पातूरमधील चान्नी, सस्ती, पातूर. अकोल्यातील दहीहंडा, कापशी, बोरगाव, शिवणी, पळसो, कौलखेड, अकोला, उगवा, आगर, सांगळूद, कुरणखेड, घुसर. बार्शिटाकळीमधील राजंदा, महान, खेर्डा, बार्शीटाकळी आणि मूर्तिजापूरमधील शेलू, कुरूम व निंबा या महसूल मंडळांचा समावेश असल्याचे अहवालात नमूद आहे.

### सहा तालुक्यात ५० टक्क्यांच्या आत पाऊस

अहवालानुसार जिल्ह्यातील सहा तालुक्यातील १३ महसूल मंडळात ५० टक्केच्या आत पाऊस झाला आहे. यामध्ये आकोट तालुक्यातील कुटासा, बाळापूरमधील उरळ, हातरून, पातूर तालुक्यातील बाभूळगाव, सस्ती, चान्नी, अकोला तालुक्यातील कापशी, उगवा, आगर, बोरगाव, शिवणी, बार्शिटाकळीतील धाबा आणि मूर्तिजापूरमधील शेलू अशा १३ मंडळांचा समावेश आहे.

### अशी आहे दुष्काळ व्यवस्थापन समिती

अध्यक्ष- जिल्हाधिकारी वर्षा मीना, सहअध्यक्ष- जि.प. सीईओ अनय नावंदर, निमंत्रित सदस्य- डॉ.सुनील लहाने आयुक्त मनपा, सदस्य सचिव- गजेंद्र मालठाणे निवासी उपजिल्हाधिकारी, सदस्य- उपवनसंरक्षक आर.आर चौबे, उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. संजय कावरे, वरिष्ठ भू-वैज्ञानिक संजय कराड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. तुषार जाधव, कार्यकारी अभियंता मजीप्रा एस.एम. राठोड, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा अतुल साळुंके, जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, उपसंचालक कृषी, हरीश देशमुख यांचा समावेश आहे.

# अकोटात उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ निवड समितीचे पुनर्गठन

## शासकीय मार्गदर्शक सूचनांनुसार मंडळांचे गुणांकन; तालुकास्तरावरून उत्कृष्ट मंडळांची होणार निवड

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोट :** महाराष्ट्र शासनाने यंदाचा सार्वजनिक गणेशोत्सव 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर निवड करून त्यांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यासाठी अकोट तालुक्यातील गणेशोत्सव मंडळांची निवड करण्याकरिता उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी तालुकास्तरीय निवड समितीचे पुनर्गठन केले आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण, तर सदस्य सचिवपदी गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांचाही समितीत समावेश करण्यात आला आहे.

समितीत उपविभागीय अभियंता धनंजय बार्डे, पोलिस निरीक्षक किशोर जुनघरे, पोलिस निरीक्षक श्रेयस गंगाधरराव गुट्टे यांच्यासह अशासकीय सदस्य म्हणून सेवानिवृत्त चित्रकला शिक्षक गजानन शिंगणारे आणि संगीत शिक्षक अजय महादेवराव



लोणकर यांचा समावेश आहे.

शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार गणेशोत्सव मंडळांचे विविध निकषांवर गुणांकन करण्यात येणार आहे. सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरक गणेशोत्सव, स्वच्छता, सांस्कृतिक कार्यक्रम, महिला व युवकांचा सहभाग, सामाजिक प्रबोधन आदी बाबींच्या आधारे मंडळांची पाहणी व मूल्यांकन होण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेतून तालुक्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांची निवड करून त्यांची पुढील जिल्हास्तरीय निवडीसाठी शिफारस केली जाणार आहे.

राज्य शासनाने सार्वजनिक गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सवा'चा दर्जा दिल्याने यंदा गणेशोत्सव मंडळांमध्येही उत्कृष्टतेसाठी चुरस निर्माण होणार असून, सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना विशेष महत्त्व मिळणार आहे.

## अकोट गणरायाच्या स्वागतासाठी सज्ज

**अकोट :** गणेशोत्सवाला सुरुवात अकोट शहरात गणरायाच्या आगमनाची लगबग सुरू झाली आहे. विविध गणेश मंडळांकडून भव्य गणेशमूर्तींचे आगमन होत असून, मंडप उभारणीसह आकर्षक सजावट व रोषणाईची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गणरायाच्या आगमनावेळी ढोल-ताशांचा गजर आणि गणेशभक्तांचा उत्साह यामुळे शहरातील वातावरण आनंदमय होत आहे. मोठ्या गणेशमूर्ती नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून, बाप्पाच्या स्वागतासाठी मंडळांचे कार्यकर्ते उत्साहाने तयारी करताना दिसत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांत मंडप सजू लागले आहेत. आगामी काळात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण अधिक रंगणार आहे.

# किराणा दुकानाच्या वादातून दोन गट आमनेसामने!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** — शहरातील रेहमतनगर-जुनी वस्ती परिसरात किराणा दुकानाच्या वादातून दोन गट आमनेसामने आल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी घडली. या प्रकरणी दोन्ही पक्षांनी परस्परविरोधी तक्रारी दिल्याने मूर्तिजापूर शहर पोलिसांनी स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

एका तक्रारीनुसार, अमतुल मुजीब मोहम्मद फारुक यांच्या किराणा दुकानात मोहम्मद मकसूद व मोहम्मद जाहीद यांनी प्रवेश करून दुकानातील साहित्याची नासधूस केल्याने सुमारे १८ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. तसेच लोखंडी पाइपने मारहाण केल्याची तक्रारही करण्यात आली आहे.

तर दुसऱ्या पक्षाकडूनही मारहाण व शिवीगाळ केल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे.

या तक्रारीनुसार मोहम्मद रिझवान यांच्यासह अन्य व्यक्तींवर अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दोन्ही तक्रारींच्या आधारे पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले असून, घटनेचा पुढील तपास ठाणेदार धर्मेश जोशी यांच्या मार्गदर्शनात मूर्तिजापूर शहर पोलिस करीत आहेत.

# लोकसहभागातून मुलांना शालेय साहित्य वाटप!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील ब्रह्मी बुद्रुक येथील जिल्हा परिषद उर्दू शाळा आणि अंगणवाडी केंद्र येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.चिंतामण कांबळे तर प्रमुख अतिथी म्हणून वन अधिकारी अशोक थोरात, केंद्रप्रमुख मनमोहन जामनिक, माजी केंद्रप्रमुख दिलीप सरदार, माजी मुख्याध्यापक नागोराव शेजव,प्रा.गोवर्धन इंगोले इत्यादी उपस्थित होते .

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले



त्यानंतर आचार्य पदवी प्राप्त प्रा. डॉ.राजकुमार खंदारे, रेल्वेमध्ये नियुक्त झाल्याबद्दल कु. प्रतीक्षा भगवंत सरदार, उपसरपंच मोहम्मद अली, केंद्र प्रमुख मनमोहन जामनिक, मुख्याध्यापक सुरेश मडावी,शिक्षक रामेश्वर धंदर मुख्याध्यापक मोहम्मद हकीम,शिक्षक रवींद्र डोंगरे,मुकुंद पांढरे, सिंधुबाई इंगळे, सबीहा बानो इत्यादींचा सत्कार करण्यात आला.जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मदत करून लोकांचा सहभाग वाढवणे यासाठी हा उपक्रम घेण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांनी जिल्हा परिषद शाळेचा दर्जा सुधारण्यासंदर्भात व वाचवण्या संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शाळा समिती अध्यक्ष मोहम्मद जमीर,निरंजन वरघट,इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक समाधान इंगळे तर सूत्र संचालन वर्षा इंगळे यांनी केले.

# मूर्तीजापूरात 38 लिटर दारूसह आरोपी ताब्यात!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**मूर्तीजापूर :** शहरातील वडरपुरा परिसरात समाज मंदिराच्या मागील बाजूस गावठी हातभट्टीची दारू विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका इसमाविरुद्ध मूर्तीजापूर शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ३८ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली असून, तिची किंमत ७ हजार ६०० रुपये आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास गुप्त माहितीच्या आधारे पंचांसमक्ष वडरपुरा येथील समाज मंदिराच्या मागे छापा टाकण्यात आला. यावेळी राहुल सुरेश घोरसडे (वय ४०, रा. सिद्धार्थनगर, मूर्तीजापूर) याच्या ताब्यात दोन




प्लास्टिक कॅनमध्ये ३८ लिटर गावठी हातभट्टीची दारू आढळून आली. यासोबत दोन प्लास्टिक ग्लासही जप्त करण्यात आले.

याप्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन जगदीश दुबे यांच्या फिर्यादीवरून मूर्तीजापूर शहर पोलीस ठाण्यात अप. नं. ६७८/२६, कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रोहिबिशन ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास योगेश लोणकर करीत असून, गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही मपोहेका शालिनी सोळंके यांनी केली.

# पातूरातआठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**पातूर :** पातूर शहरातील आठवडी बाजाराच्या दिवशी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी नागरिकांच्या महागड्या मोबाईलवर डल्ला मारल्याची घटना समोर आली आहे. एकाच दिवशी तब्बल सहा ते सात नागरिकांचे मोबाईल चोरीला गेल्याची चर्चा असून, या प्रकारामुळे आठवडी बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आठवडी बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असताना चोरट्यांनी नागरिकांच्या गर्दीचा फायदा घेत मोबाईल लंपास केल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे मोबाईल चोरीला गेल्यानंतरही संबंधित नागरिकांकडून 'मोबाईल हरविल्याची' तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे चोरीच्या घटनांची अधिकृत संख्या आणि प्रत्यक्षात चोरीला गेलेल्या मोबाईलची संख्या यामध्ये फरक असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, आठवडी बाजाराच्या दिवशी पातूर पोलिसांकडून योग्य आणि प्रभावी गस्त ठेवण्यात आली असती, तर अशा प्रकारच्या घटना रोखता आल्या असत्या, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. बाजार परिसरात पोलिसांची उपस्थिती आणि संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवण्याची यंत्रणा अधिक प्रभावी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

मोबाईल चोरीच्या या घटनांना काही दिवस उलटूनही अद्याप कोणत्याही संशयित आरोपीचा शोध लागलेला नसल्याने पोलिसांच्या तपासाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. बाजारपेठेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून चोरट्यांचा शोध घेण्याची मागणी होत आहे.

आठवडी बाजारातील नागरिकांची सुरक्षा आणि चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पातूर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# हरतालिका आणि गणेशोत्सव : भक्तीला विचारांची, उत्सवाला संस्कारांची जोड!

## हरतालिकेतून आत्मशक्ती जागवूया, गणरायाच्या आगमनातून व्यसनमुक्ती, शांतता आणि बंधुभावाचा संकल्प करूया!

भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ पूजा, उपवास, आरती आणि आनंद साजरा करण्यापुरते मर्यादित नसतात. प्रत्येक सणाच्या मुळाशी जीवनाला दिशा देणारा आणि समाजाला योग्य मार्ग दाखविणारा विचार दडलेला असतो. याच विचारांची सुंदर सांगड हरतालिका आणि गणेशोत्सव या दोन्ही सणांत पाहायला मिळते.

आजच्या बदलत्या काळात या सणांकडे केवळ परंपरा म्हणून न पाहता, त्यांच्या मागील मूल्यांचा आणि सामाजिक संदेशाचा नव्याने विचार करण्याची गरज आहे.

**हरतालिका : पतीप्राप्तीच्या पलीकडे आत्मशक्तीची प्रार्थना**

हरतालिका म्हटले की प्रामुख्याने मुली किंवा महिला पतीप्राप्तीसाठी व्रत करतात, अशी धारणा समाजात रूढ आहे. श्रद्धेचा हा भाग महत्त्वाचा असला, तरी हरतालिकेचा संदेश केवळ पतीप्राप्तीपुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. आजच्या काळात हरतालिका म्हणजे स्त्रीच्या आत्मशक्तीची, आत्मविश्वासाची आणि कर्तृत्वाची उपासना असा व्यापक अर्थ आपण स्वीकारायला हवा.

**या दिवशी मुलींनी ईश्वराकडे केवळ भविष्यातील सुखी संसाराची मागणी न करता—**

"माझ्यामध्ये चांगले विचार निर्माण होऊ देत, संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य मिळू दे, योग्य-अयोग्य ओळखण्याचा विवेक मिळू दे आणि समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची शक्ती मिळू दे," अशी प्रार्थना करावी. शिक्षण, स्वावलंबन, आत्मसन्मान, संस्कार आणि सेवाभाव या गुणांनी मुलींनी सक्षम होणे, हीच आजच्या काळातील खरी गरज आहे. आणि हा संदेश केवळ मुलींसाठी नाही. मुलांनीही स्त्रीचा सन्मान करण्याची, तिच्या स्वातंत्र्याचा आदर करण्याची आणि तिला समानतेची वागणूक देण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. कारण स्त्रीचा सन्मान करणारा समाजच खऱ्या अर्थाने संस्कारी समाज असतो.

**हरतालिकेच्या निमित्ताने प्रत्येक तरुणीने स्वतःला एक प्रश्न विचारावा—**

**"मी माझ्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी काय चांगले करू शकते?"**

ईश्वरभक्ती मनाला शांतता देत असते; परंतु त्या भक्तीतून निर्माण झालेली शक्ती




समाजसेवेत वापरणे, हीच भक्तीची खरी सार्थकता आहे.

**गणपती बाप्पा : बुद्धी, विवेक आणि शांततेचे प्रतीक**

गणपती बाप्पाचे आगमन म्हणजे आनंद, उत्साह आणि नवचैतन्याचा सोहळा. परंतु गणेशोत्सव केवळ सजावट, रोषणाई, ढोल-ताशे आणि मिरवणुकांपुरता मर्यादित राहू नये. गणपती म्हणजे बुद्धी आणि विवेकाचे प्रतीक. त्यामुळे बाप्पाचे स्वागत करताना आपल्या जीवनातही चांगल्या विचारांचे स्वागत झाले पाहिजे.

आज तरुण पिढीसमोर व्यसनाधीनता, चुकीची संगत, वेळेचा अपव्यय आणि विविध सामाजिक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत गणेशोत्सव हा तरुणांना योग्य दिशा देणारा ठरला पाहिजे.

**बाप्पाच्या आगमनाच्या दिवशी आपण एक संकल्प करूया—**

व्यसनाला नाही म्हणूया, वाईट सवयी सोडूया, शिक्षण आणि कर्तृत्वाला प्राधान्य देऊया आणि समाजासाठी काहीतरी चांगले करण्याचा प्रयत्न करूया.

गणेशोत्सवाच्या मंडपातून केवळ गाणी आणि मनोरंजनाचे कार्यक्रम न होता, व्यसनमुक्ती, शिक्षण, पर्यावरणसंवर्धन, रक्तदान, स्वच्छता, गरजूंची मदत आणि सामाजिक एकतेचे संदेश दिले गेले, तर उत्सवाला खऱ्या अर्थाने सामाजिक मूल्य प्राप्त होईल.

गणपती बाप्पा हा शांततेचा, आपुलकीचा आणि बंधुभावाचा प्रतीक म्हणून आपल्या मनात असला पाहिजे. बाप्पाच्या आगमनाने घरातील वातावरण प्रसन्न व्हावे आणि त्याचबरोबर समाजातील दुरावाही कमी व्हावा.

**दोन सण, एकच संदेश**

हरतालिका आपल्याला आत्मशक्ती, आत्मसन्मान, संस्कार आणि सेवाभाव शिकवते, तर गणपती उत्सव आपल्याला बुद्धी, विवेक, शांतता, एकता आणि सामाजिक बांधिलकी शिकवतो. म्हणून या दोन्ही सणांचा एकत्रित संदेश आपण आपल्या जीवनात उतरवूया.

**मुलींनी सक्षम व्हावे, मुलांनी संस्कारी व जबाबदार व्हावे;**

तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे, ज्येष्ठांचा सन्मान करावा; कुटुंबात प्रेम वाढावे आणि समाजात बंधुभाव निर्माण व्हावा. सण मोठा करण्यापेक्षा सणामागचा विचार मोठा करूया. दिखावा करण्यापेक्षा चांगले कार्य करूया. फक्त देवासमोर हात जोडण्यापेक्षा देवाने दाखविलेल्या चांगल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करूया.

हरतालिकेच्या भक्तीतून आत्मशक्ती जागवूया, गणरायाच्या आगमनातून विवेक जागवूया, व्यसनमुक्तीचा संकल्प करूया, आणि प्रेम, शांतता व बंधुभावाने समाज अधिक सुंदर बनवूया.

**भक्ती मनात असू द्या, संस्कार आचरणात असू द्या;**

उत्सव घरात साजरा होऊ द्या, पण त्याचा प्रकाश संपूर्ण समाजात पसरू द्या!"**

गणपती बाप्पा मोरया!
मंगलमूर्ती मोरया!
हरतालिका मातेला वंदन!

— लेखणी —
निवृत्ती तायडे
गा. हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला
मो. 7709517019

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## गोवंश मांस विक्रीप्रकरणी एकास अटक

**मुर्तीजापूर** : कुरेशी मोहल्ला, जुनीवस्ती परिसरात गोवंश मांस विक्री करताना एका व्यक्तीस पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी करण्यात आली. अब्दुल गफ्फार अब्दूल गुलाब कुरेशी (वय ३२, रा. खडकपूरा, दर्गाह मस्जिद, मुर्तीजापूर) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिस पथकाने पंचांसह घटनास्थळी पाहणी केली असता आरोपीजवळ प्लास्टिकच्या पोत्यात सुमारे ३० किलो गोवंश मांस, किंमत अंदाजे ७ हजार २०० रुपये, तसेच लोखंडी सुरा असा एकूण ७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

# अडगाव परिसरातील 30 हजार लोकसंख्या एटीएम सुविधेपासून वंचित

## ग्राहकांमध्ये संताप, 10-12 गावातील लोकांना अकोट-हिवरखेडला जावे लागत आहे

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अडगांव बु.**: शासन-प्रशासनाकडून बँकांना ग्राहकांना सर्वतोपरी सुविधा द्याव्यात अशा सूचना दिल्या जातात, परंतु तेल्हारा तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या अडगाव बु. मध्ये याच्या अगदी उलट परिस्थिती आहे. ३० हजार लोकसंख्या असलेल्या या जुळ्या नगरात एकही एटीएम कार्यरत नसल्याने हजारो ग्राहक त्रस्त झाले आहेत.

स्थानिकांचा आरोप आहे की, अडगाव बु. येथील सेंट्रल बँकेचे एटीएम आधी गावातच कार्यरत होते, ते काही दिवसांपूर्वी बंद करण्यात आले. एवढेच नव्हे तर बँकेची शाखा सुद्धा मुख्य बाजारातून १ किलोमीटर दूर बस स्थानकावर हलविण्यात आली आहे.

### मंडी गावात, बँक बाहेर

अडगाव बु. येथे सेंट्रल बँक ऑफ इंडियाची शाखा आहे, तर लगतच्या शिवाजी नगर गावात अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा आहे. या दोन्ही गावांना लागून असलेल्या सिरसोली, मालठाणा, चोरवड, एदलापूर, सदरपूर, खैरखेड, चितलवाडी, धोंडाखर, चीपी, गायरान, करी आदी १०-१२ गावांची मुख्य बाजारपेठ अडगाव बु. मध्येच भरते. रोज हजारो शेतकरी, व्यापारी आणि मजुरांची वर्दळ असते, तरीही दोन्ही बँकांनी येथे एटीएम सुविधा दिलेली नाही.

### शेतकरी, विद्यार्थी आणि निराधार




### लाभार्थ्यांना सर्वाधिक त्रास

या बँकेचे बहुतांश खातेधारक हे व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी आणि संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, अपंग योजनेचे लाभार्थी आहेत. एक किलोमीटर दूर बस स्थानकापर्यंत जाऊन पैसे काढणे त्यांना कठीण जात आहे. एटीएम नसल्यामुळे ५००-१००० रुपयांच्या छोट्या रकमेसाठी सुद्धा लोकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे, त्यामुळे गर्दी होत आहे.

ग्राहकांचा आरोप आहे की, बँकेत अनेकदा 'लिंक नाही', 'कॅश नाही' असे सांगून वेळ मारून नेली जाते, त्यामुळे त्यांची कामे खोळंबत आहेत.

ग्रामस्थांनी मागणी केली आहे की, सेंट्रल बँकेने गावातील मुख्य बाजारातच पुन्हा एटीएम सुरू करावे आणि ADCC बँकेनेही अडगावात आपल्या एटीएम सुविधेचा विस्तार करावा, जेणेकरून ३० हजार लोकसंख्येला दिलासा मिळेल.

### ADCC बँकेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

दुसरीकडे अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेची एटीएम सुविधा आहे, पण तिनेही अडगावसारख्या मोठ्या बाजारपेठेत मशीन का बसवली नाही, असा सवाल ग्रामीण उपस्थित करत आहेत. लोकांना नाईलाजाने अकोट किंवा हिवरखेडला जाऊन पैसे काढावे लागत आहेत.

# गणरायाच्या आगमनातून सामाजिक सलोख्याचा संदेश

## श्री तेज हनुमान गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम; सर्वधर्मीय मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पहाराने सन्मान

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**मुर्तीजापूर** : गणरायाच्या आगमनाचा उत्साह, भक्ती आणि आनंदाला सामाजिक एकोप्याची सुंदर किनार देत श्री तेज हनुमान गणेश मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सामाजिक सलोखा व बंधुभावाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणत 'एकता, बंधुता आणि सामाजिक सौहार्द' यांचा संदेश देण्याचा अनोखा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

मुर्तीजापूर नगर परिषदेचे उपाध्यक्ष रोहित अव्वलवार यांच्या पुढाकाराने श्री तेज हनुमान गणेश मंडळाच्या वतीने गणरायाच्या आगमनानिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीदरम्यान शहरातील विविध जाती-धर्मांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच गणेश मंडळांच्या सदस्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन



सन्मान करण्यात आला.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजाला जोडणारा, माणसामाणसांतील अंतर कमी करणारा आणि बंधुभाव दृढ करणारा उत्सव ठरावा, या भावनेतून मंडळाने हा उपक्रम आयोजित केला. विविध धर्म व समाजघटकांतील मान्यवरांचा एकाच व्यासपीठावर सन्मान करून मुर्तीजापूर शहराच्या सामाजिक एकतेची समृद्ध परंपरा अधोरेखित करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष हर्षल साबळे, ज्येष्ठ नगरसेवक सचिन देशमुख, नगरसेवक संजय डागा, संदीप सरनाईक, राहुल पाटील, पंकज कांबे, सामाजिक कार्यकर्ते इब्राहिमभाई घाणीवाला, तसेच लखन मिलांदे, मुकेश काळपांडे, राहुल गुल्हाने, अब्दुल बाकी, भारत जेठवानी, कैलास महाजन, भूपेंद्र पिंपळे, राम जोशी, राम खंडारे, तसंवर खान, निलेश वानखडे, लखन अरोरा, गंपू शर्मा रामा हजार, निजाम ललकार, रितेश सबाजकर,अविनाश येवले, सद्दाम, आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

याशिवाय पोलीस उपनिरीक्षक राजू वानखडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, विविध पदाधिकारी, गणेश मंडळांचे सदस्य आणि भाविकांचेही उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

# आज लाडक्या गणरायाचे आगमन; अकोट शहर बाप्पामय

## भक्तिमय वातावरणात घरोघरी विराजणार 'बाप्पा'; बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी

वि.प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोट**: 'गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया...'च्या जयघोषात लाडक्या गणरायाचे आज (सोमवारी) अकोट शहरासह ग्रामीण भागात उत्साहात आगमन होणार आहे. गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर घराघरांत गणरायाच्या स्वागताची तयारी पूर्ण झाली असून, शहरातील बाजारपेठा गणेशमूर्ती, मखर, फुलांची आरास, विद्युत रोषणाई आणि पूजेच्या साहित्याने सजल्या आहेत. रविवारी गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला खरेदीसाठी नागरिकांनी बाजारपेठेत मोठी गर्दी केली होती.

यंदा गणेश चतुर्थी आणि हरितालिका एकाच दिवशी आल्याने धार्मिक उत्साहाला विशेष रंग चढला आहे. सकाळपासूनच महिला तसेच



गणेशभक्तांची पूजाविधीच्या तयारीसाठी लगबग सुरू राहणार आहे. घरोघरी गणरायाची प्रतिष्ठापना करण्यासाठी आवश्यक साहित्याची खरेदी रविवारी दिवसभर सुरू होती.

### प्रतिष्ठापनेसाठी शुभमुहूर्त

१४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थी असून, चतुर्थी तिथीचा प्रारंभ सकाळी ७ वाजता होऊन १५ सप्टेंबर रोजी सकाळी ७.४४ वाजता तिथी समाप्त होणार आहे.

१४ सप्टेंबर गणेशमूर्ती स्थापनेसाठी सकाळी ११ ते दुपारी १.४८ असा शुभमुहूर्त असल्याने या कालावधीत मोठ्या संख्येने गणेशभक्तांकडून बाप्पाची प्रतिष्ठापना केली जाणार आहे.

### विविध रूपांतील गणेशमूर्तींची रेलचेल

अकोट शहरातील गणेशमूर्ती विक्रीच्या ठिकाणी विविध आकारांच्या आणि आकर्षक रूपातील मूर्ती उपलब्ध झाल्या आहेत. पारंपरिक रूपाबरोबरच आकर्षक सजावट असलेल्या गणेशमूर्तींना नागरिकांकडून पसंती मिळत आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्तींनाही यंदा मागणी असल्याचे चित्र आहे. आपल्या आवडीची मूर्ती घेण्यासाठी रविवारी व सोमवारी सकाळी अनेक गणेशभक्तांनी बाजारपेठेत गर्दी केली होती.

### मंदिराच्या आकाराच्या मखरांना पसंती

गणरायाच्या स्वागतासाठी सजावटीच्या साहित्याचीही मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. बाजारात विविध प्रकारचे मखर विक्रीस आले असून, मंदिराच्या आकाराचे मखर, पारंपरिक मंदिरांचे देखावे तसेच विविध धार्मिक स्थळांच्या प्रतिकृती असलेल्या सजावटी नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. फुलांचे हार, तोरणे, विद्युत रोषणाई, पूजेचे साहित्यही मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आली.

# मुजफ्फरनगरमध्ये सापडले नवजात बाळ

**अकोला** : शहरातील मुजफ्फरनगर आणि नया बैदपुरा परिसरात आज एका हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण शहर सुन्न झाले आहे. शहरात सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसादरम्यान एका अज्ञाताने अवघ्या काही तासांच्या नवजात बालकाला रस्त्याच्या कडेला बेवारस सोडून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, मानवतेला काळीमा फासणाऱ्या या कृत्यामुळे अकोलेकरांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

रविवारी, मुजफ्फरनगर परिसरात मुसळधार पाऊस सुरू असताना रस्त्यावरून जाणाऱ्या काही नागरिकांना लहान बाळाच्या रडण्याचा बारीक आवाज ऐकू आला. संशय आल्याने नागरिकांनी आवाजाच्या दिशेने जाऊन पाहिले असता, एका कोपऱ्यात कापडात गुंडाळलेले नवजात बाळ अत्यंत असहाय्य अवस्थेत भिजताना आढळले. नागरिकांनी विलंब न करता प्रसंगावधान राखले आणि बाळाला तात्काळ उचलून सुरक्षित ठिकाणी नेले. त्यांनी कपड्याने बाळाला कोरडे करून उबदार ठेवण्याचा प्रयत्न केला आणि घटनेची माहिती रामदासपेठ पोलीस ठाण्याला दिली.घटनेचे गांभीर्य ओळखून

### अल्पवयीन मातेचा पोलीस घेत आहे शोध

रामदासपेठ पोलीस पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी बालकाला आपल्या ताब्यात घेऊन तातडीने जिल्हा महिला रुग्णालयात (लेडी हार्डिंग) वैद्यकीय तपासणी आणि उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांच्या प्राथमिक अंदाजानुसार बाळ सुखरूप असून त्याच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.प्राथमिक तपासात हे कृत्य एका अल्पवयीन मातेकडून किंवा कौटुंबिक दबावातून झाले असण्याची शक्यता पोलीस वर्तवत आहेत. या निर्दयी घटनेमागचे खरे कारण काय, बाळ कोणाचे आहे आणि भर पावसात त्याला मृत्यूच्या दाढेत कोणी सोडून दिले, याचा सखोल शोध रामदासपेठ पोलीस घेत आहेत. पोलिसांनी मुजफ्फरनगर आणि आसपासच्या परिसरातील सर्व मुख्य रस्ते तसेच दुकानांचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. तसेच स्थानिक रुग्णालये आणि प्रसूती गृहांचीही माहिती गोळा केली जात आहे. निष्पाप बाळाला बेवारस सोडणाऱ्या आरोपीचा शोध युद्धापातळीवर सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# गौरी गणपतीला बाहेरगावी जात आहे...

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला** : अकोला शहरात सध्या कायदा व सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळत असून, चोरट्यांचे धाडस प्रचंड वाढले आहे. रविवारी शहरातील मोठी उमरी परिसरातील जामोदकर लेआउट, लोखंडे लेआउट आणि हनुमाननगर या भागात चोरट्यांनी एकाच रात्री तब्बल पाच बंद आणि उघड्या घरांना लक्ष्य करत घरफोडीच्या घटना घडवून आणल्या. एकाच रात्री झालेल्या या धाडसी चोऱ्यांमुळे संपूर्ण परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

### थांबा, अकोल्यात चोऱ्यांचे सत्र तीव्र

लोखंडे लेआउट येथील रहिवासी विजय जायभाये यांच्या घरी चोरट्यांनी कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कपाट, पेट्या आणि गाद्यांची मोठ्या प्रमाणावर उचक पाचक केली. मात्र, नशीब बलवत्तर म्हणून जायभाये यांच्या घरातील मौल्यवान साहित्य आधीच सुरक्षित ठिकाणी असल्याने चोरट्यांच्या हाती मोठा ऐवज लागला नाही.

अशाच पद्धतीने परिसरातील इतर चार घरांमध्येही चोरट्यांनी हातसाफ करण्याचा प्रयत्न व्केला.

या घटनेतील सर्वात धक्कादायक आणि गंभीर बाब म्हणजे जामोदकर लेआउट येथे राहणाऱ्या एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या घरालाही चोरट्यांनी सोडले नाही. एका माजी पोलिसाच्याच घरात घरफोडी झाल्याने पोलिसांच्या सुरक्षेचा दावा पार उघडा पडला आहे. विशेष म्हणजे, या घटनेबाबत अधिकृत माहिती प्रसारमाध्यमांना देण्यास पोलीस प्रशासन टाळाटाळ करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. पोलिसांच्या कथित दबावामुळे या प्रकरणाची खरी माहिती बाहेर येऊ दिली जात नसल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.येणाऱ्या गौरी-गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर अनेक नागरिक आपल्या मूळ गावी किंवा बाहेरगावी जातात.

अशा वेळी घरे बंद राहणार असल्याने सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. एकाच रात्री पाच ठिकाणी चोऱ्या झाल्यामुळे रात्रीच्या वेळी जाणारी पोलीस गस्त केवळ कागदावरच आहे का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. नागरिकांना बाहेरगावी जाताना मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आवाहन केले असून, चोरट्यांचा माग काढण्यासाठी पथके तयार केली आहेत.

# डिजेचा गोंगाट, ट्रॅफिक जॅम

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला** : गणेशोत्सवाचा उत्साह शहरात ओसंडून वाहत असतानाच अकोलेकरांना मात्र तीव्र वाहतूक कोंडी आणि कानठळ्या बसवणाऱ्या डिजेच्या गोंगाटाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १ नोव्हेंबरपर्यंत संपूर्ण विदर्भात डिजे वाजवण्यावर पूर्णपणे बंदी घातली आहे. मात्र, अकोला शहरात या न्यायालयाच्या आदेशाची उघडपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. वीकेंडला म्हणजेच शनिवार आणि रविवारी शहरात झालेला नियमभंग आणि वाहतुकीचा फज्जा याने प्रशासनाच्या कारभाराची पोलखोल केली आहे.अकोला शहरात यंदा सुमारे सव्वातीनशे गणेशोत्सव मंडळांनी महानगरपालिकेकडे अधिकृत नोंदणी केली आहे. ठिकठिकाणी भव्य मंडप उभारणी आणि बाप्पांच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू आहे. परंतु, शनिवार आणि रविवारी बाप्पांच्या आगमन मिरवणुकांदरम्यान अनेक मंडळांनी उच्च न्यायालयाच्या बंदीच्या आदेशाला धाब्यावर बसवत क्षमतेपेक्षा जास्त आवाजात डिजे वाजवले. या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागला.डिजेच्या गोंगाटासोबतच शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि जोड रस्त्यांवर भीषण ट्रॅफिक जॅमची समस्या निर्माण झाली. भव्य मिरवणुका आणि रस्त्यावर लावण्यात आलेली वाहने यांमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली होती.उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही पोलीस प्रशासन आणि महानगरपालिका प्रशासन डिजे चालकांवर कारवाई का करत नाही, असा थेट सवाल अकोलेकर विचारत आहेत.

# पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांचे हाल

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला** : अकोल्याहून शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि वैद्यकीय उपचारासाठी नियमितपणे पुण्याकडे प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी एक मोठी आणि चिंतेची बातमी समोर आली आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील हडपसर-घोरपडी दरम्यान तिसऱ्या रेल्वे मार्गाच्या महत्त्वाच्या कामासाठी नॉन-इंटरलॉकिंग ब्लॉक घेतला जाणार आहे. यामुळे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत अकोला मार्गे धावणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गाड्या रद्द करण्यात आल्या असून काहींचे मार्ग संक्षिप्त करण्यात आले आहेत.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, हडपसर ते घोरपडी दरम्यान रेल्वे वाहतूक अधिक सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी तिसऱ्या लाईनचे काम युद्धपातळीवर हाती घेतले जात आहे. या कामासाठी नॉन-इंटरलॉकिंग ब्लॉक आवश्यक असल्याने गाड्यांच्या वेळापत्रकात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. यामध्ये अकोलेकरांसाठी अत्यंत सोयीची मानली जाणारी नागपूर-पुणे एक्सप्रेस २ आणि

### ब्लॉकमुळे अनेक गाड्या रद्द, मार्ग बदलले

३ ऑक्टोबर रोजी रद्द राहील, तर पुणे-नागपूर एक्सप्रेस ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी धावणार नाही. याशिवाय, अमरावती-पुणे एक्सप्रेस १९ सप्टेंबर, २२ सप्टेंबर आणि २ ऑक्टोबर रोजी पुण्यापर्यंत न जाता दौंड स्थानकापर्यंतच चालवली जाणार आहे. त्यामुळे पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांना दौंड येथून पुढे पर्यायी प्रवासाची व्यवस्था करावी लागणार आहे. यासोबतच पुणे-हावडा, पुणे-नागपूर आणि पुणे-अजनी या मार्गावरून धावणाऱ्या इतर प्रमुख गाड्यांच्या वेळेतही मोठे बदल करण्यात आले आहेत. ऐन सणासुदीच्या काळात आणि महत्त्वाच्या कामासाठी पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची यामुळे मोठी अडचण होणार आहे. खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून अशा वेळी प्रवाशांची लूट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, प्रवासाचे तिकीट आरक्षित असले तरीही स्थानकावर निघण्यापूर्वी रेल्वेच्या अधिकृत ॲप किंवा हेल्पलाइनवरून गाड्यांची अद्ययावत माहिती अवश्य तपासून घ्यावी.

# उमरा गावात 365 वर्षांची द्वारका उत्सवाची परंपरा आजही कायम

## पाच मखरामध्ये बैलाला सप्तश्रृंगार करून ग्रामस्थांची हाताने ओढण्याची प्रथा

पवन बेलसरे १४ सप्टेंबर

**अकोट** : अकोट उमरा अकोट तालुक्यातील सातपुड्यात वसलेलं उमरा येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्येच्या पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी द्वारका उत्सव उत्साहात साजरा होतो गेल्या ३६५ वर्षापासून हा उत्सव दरवर्षी मोठ्या भक्तीभावाने बळीराजा मोठ्या संख्येत साजरा करतात.

ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता बैल शेतकऱ्या सोबत वर्षभर शेतात राबतात ऋषभराजा प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वर्षभर राबणाऱ्या शेतकऱ्यांना बैलाची साथ असते म्हणून बैलांना शेतकऱ्याचा मित्र म्हटले जाते बैल हा शेतकऱ्या सोबत आयुष्यभर



जोडलेला असतो त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची वर्षभरातून वृषभ राज्याच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी येथील शेतकरी हा उत्सव साजरा करतात द्वारका उत्सवदिनी बैलांना आंघोळ घालून गोड पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ चारून त्यांची पूजाअर्चा करण्यात येते वर्षभर जी बैलबंडी बैल ओढतो त्याच बैलबंडीस अतिरिक्त दोन चाके बसवून सजावट करण्यात येते येथील लोक याला मखर (रथ) असे संबोधतात ज्या बैलाची मखरातून मिरवणूक काढायची पारंपारिक प्रथा आहे अशा बैलास चांदीचे दागदागिने हारतुरे घालून सप्तश्रृंगार सजविण्यात येते तद्नंतर बैलास मखरात उभे करून ढोल ताशे नगारे व डीजे च्या नृत्याच्या तालावर गुलालाच्या चमकणाऱ्या पत्तीच्या भव्य उधळण मध्ये संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात येते. हा मखर बैलमालक व त्याचे सहकारी तरुण पिढी एक रंग पोशाखामध्ये मोठ्या संख्येत ओढत असतात. ग्रामदैवत श्री वाकाजी महाराज मंदिरात समाधी दर्शन करून मानाच्या बैलाची व इतर सर्व बैल पूजा भस्म अंगारा व गोड नैवेद्य घेऊन मखरावर चढविले जाते मिरवणूकीस दुपार ४ वाजता प्रारंभ होतो. मंदिराच्या मुख्य चौकामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे फुलपुष्प व विशेष सजावट हे सर्व यात्रा करू साठी आकर्षण ठरले इथूनच गावांमधील मुख्य रोडवर महिला भगिनींनी साफसफाई स्वच्छता व विविध रांगोळ्यांच्या फुलांची सजावट करतात द्वारका उत्सव मिरवणुकीत भगवे झेंडे पताका पारंपारिक वाद्य ढोल नगारे ताशे व झांज्या यांच्या भव्य हनुमंत राया महाकाय प्रकट रूप धारण करून विविध नृत्य पाहणाऱ्यांचे आकर्षण लक्षवेधन ठरले होते सामाजिक उपक्रमाचे अनोखे संदेश देणारे सूचनाफलक व रिल्स स्टार आकर्षण पाहायला मिळाले यावर्षी या पाच शेतकऱ्यांचे बैल मखरातून काढण्यात आले यापूर्वी २५ ते ३० बैल मखरातून निघत होते.

# अकोटमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीत 1.55 कोटींची विक्रमी वसुली; 1,430 प्रकरणांचा निपटारा

वि. प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोट**: तालुका विधी सेवा समिती, अकोट यांच्या वतीने शनिवारी (दि. १२ सप्टेंबर) आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत विविध प्रकारच्या प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करत तब्बल रु. १ कोटी ५५ लाख ६६ हजार ६४४ इतक्या रकमेची वसुली करण्यात आली. तसेच एकूण १,४३० प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आल्याने ही लोकअदालत उल्लेखनीय ठरली.

जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष बी. एम. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही राष्ट्रीय लोकअदालत पार पडली. लोकअदालतीसाठी चार स्वतंत्र पॅनल स्थापन करण्यात आले होते. यामध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात दावे, बँक प्रकरणे, दाखलपूर्व प्रकरणे, एम.ए.सी.टी. प्रकरणे तसेच ग्रामपंचायतींचे घरकर, पाणीपट्टी आणि इतर वसुलीशी संबंधित प्रकरणांचा समावेश होता.

लोकअदालतीतील पॅनल प्रमुख म्हणून एस. एम. काळे (दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर), शेख आरीफ हारुन (सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर) तसेच ए. ए. माळी (द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर) यांनी कामकाज पाहिले. विधिज्ञ व्ही. एस. लाखे, वाजीद अली अफजल अली, मोहम्मद जुनेद आणि जी. एन. तळोकार यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

यावेळी विविध बँकांचे अधिकारी व कर्मचारी, पंचायत समिती अकोटचे कर्मचारी, समाजसेवक विजय जितकर, विधी स्वयंसेवक के. एन. पंत तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय लोकअदालतीत ७९३ दिवाणी व फौजदारी प्रकरणांचा निपटारा करण्यात आला, तर १,२८४ दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली. तडजोडीच्या माध्यमातून अनेक वाद मिटवून न्यायप्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान करण्यास लोकअदालतीने महत्त्वपूर्ण योगदान दिले. लोकअदालत यशस्वी करण्यासाठी व्ही. पी. कावरे (अधीक्षक), अनिल यू. वानखडे (सहायक अधीक्षक) तसेच सर्व न्यायालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतल्याचे अध्यक्ष बी. एम. पाटील यांनी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# महागाव तालुक्यात रेबीजचा पहिला बळी

## कुत्र्याच्या चाव्यानंतर उपचार अपूर्ण; जिल्हा रुग्णालयातूनही रुग्ण निघून गेला

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**यवतमाळ** : महागाव तालुक्यातील सवना येथील मथुरा तांडा परिसरातील रामदास हिरामण जाटवे (४५) यांचा रेबीजच्या संसर्गामुळे सोमवारी पहाटे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला. कुत्र्याच्या चाव्यानंतर वेळेवर उपचार पूर्ण न झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

महागाव तालुक्यात रेबीजमुळे झालेला हा पहिला मृत्यू असल्याचे बोलले जात आहे.

जाटवे यांना १९ ऑगस्ट रोजी त्यांच्या राहत्या घरी एका पिसाळलेल्या कुत्र्याने डोक्याला चावा घेतला होता. त्यानंतर त्यांनी सवना ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार घेतले. मात्र, रेबीज प्रतिबंधक लसीकरण व पुढील उपचारांचा पूर्ण उपचारक्रम त्यांनी पूर्ण केला नाही. काही दिवसांनी त्यांच्यामध्ये रेबीजची लक्षणे दिसू लागली.

पाण्याची भीती वाटणे, घसा आवळणे आणि तीव्र ताप यांसारख्या त्रासामुळे त्यांना यवतमाळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच ते रुग्णालयातून निघून गेले.

दरम्यान, जाटवे यांच्या प्रकृतीची माहिती महागाव तालुका आरोग्य विभागाला मिळाल्यानंतर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निमीश धुळधुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सवना येथे जाऊन त्यांच्या नातेवाइकांची भेट घेतली. त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करून उपचार घेण्याबाबत समजावून सांगण्यात आले. मात्र, रुग्ण व नातेवाइकांकडून उपचारासाठी अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. अखेर सोमवारी पहाटे जाटवे यांचा मृत्यू झाला.

रेबीज हा कुत्रा किंवा अन्य संक्रमित प्राण्याच्या लाळेतून होणारा गंभीर संसर्गजन्य आजार आहे. कुत्र्याने चावा घेतल्यानंतर जखम साधी समजून दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. जखम तातडीने स्वच्छ करून वैद्यकीय सल्ल्यानुसार रेबीज प्रतिबंधक लसीकरणाचा पूर्ण उपचारक्रम घेणे आवश्यक आहे. त्यामुळे भटक्या किंवा पिसाळलेल्या कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

# 'डिजिटल पत्रकारां'चा सुळसुळाट; शिष्टमंडळाचे प्रशासनाला निवेदन



प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**दिग्रस** : यवतमाळ जिल्ह्यात अनधिकृत न्यूज पोर्टल, यूट्यूब चॅनेल आणि इन्स्टंट पीडीएफ ई-पेपरच्या नावाखाली पत्रकारितेचा गैरवापर करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी यवतमाळ जिल्हा श्रमिक पत्रकार संघ व दिग्रस येथील पत्रकारांच्या शिष्टमंडळाने केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हा माहिती अधिकारी यांना संयुक्त निवेदन देण्यात आले.

सध्या डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे सोशल मीडिया पेज किंवा यूट्यूब चॅनेल सुरू करून स्वतःला पत्रकार अथवा संपादक म्हणून मिरवणे सोपे झाले आहे.

### नियमांची कडक अंमलबजावणी करा

■ एखादी व्यक्ती वृत्तप्रतिनिधी असल्याचा दावा करत असल्यास तिचे माध्यम, मालक, संपादक, कार्यालयाचा पत्ता आणि अधिकृत नियुक्तिपत्राची कडक पडताळणी प्रशासनाने करावी. माध्यमाची वैधता तपासूनच शासकीय पातळीवर मान्यता किंवा सुविधा द्याव्यात. तसेच, केवळ तक्रारीच्या आधारावर कारवाई न करता निष्पक्ष चौकशी करून "दूध का दूध, पानी का पानी" करावे, जेणेकरून निरपराधांची बदनामी टळेल आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई होईल, अशी स्पष्ट भूमिका पत्रकारांनी मांडली.

मात्र, केवळ डिजिटल प्लॅटफॉर्म चालवणे म्हणजे अधिकृत वृत्तपत्राचे प्रतिनिधित्व ठरत नाही. या नावाचा दबाव तंत्रासारखा वापर करून शासकीय अधिकारी, कर्मचारी व सामान्य नागरिकांना धमकावणे, आर्थिक मागण्या करणे असे गैरप्रकार वाढीस लागले आहेत. यामुळे प्रामाणिक पत्रकारितेच्या विश्वासार्हतेला तडे जात असून, क्षेत्रात "गधे आणि घोडे एकाच रांगेत" उभे राहण्याची परिस्थिती निर्माण झाल्याची गंभीर बाब निवेदनात नमूद करण्यात आली आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी जिल्हा श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकांत राऊत, संदीप खडेकर, नितीन पखाले, नागेश गोरख, अमोल ढोणे, वीरेंद्र चौबे, चेतन देशमुख, नीलेश फाळके, केशव सवळकर, समीर मगरे, राजकुमार भीतकर, जयंत राठोड, तुषार देशमुख, प्रवीण देशमुख, नितीन राऊत, अतुल राऊत, दीपक शास्त्री, तसेच दिग्रसचे पत्रकार अभय इंगळे, रामदास पद्मावार, सुरेंद्र मिश्रा, विष्णूपंत यादव, संदीप चिस्तळकर, संदीप रत्नपारखी, लुकमान खान, संजय राऊत, लक्ष्मण टेकाडे, विलास निकम, प्रफुल्ल व्यवहारे आदी उपस्थित होते.

# मराठा आरक्षणासाठी उमरखेडमधून नागरिकांची मुंबईकडे कूच

## आझाद मैदानावरील आंदोलनाला पाठिंबा : सकल मराठा समाजाचे आवाहन

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**उमरखेड** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील मागील पंधरा दिवसांपासून उपोषणाला बसले असूनही शासन उदासीन आहे. त्यामुळे मुंबईतील आझाद मैदानावरील आंदोलनाला बळ देण्यासाठी उमरखेड तालुक्यातील मराठा बांधवांनी घराघरातून मुंबईकडे कूच करावी, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने स्थानिक विश्रामगृहातील पत्रकार परिषदेत करण्यात आले.

मागण्यांवर तोडगा न निघाल्याने समाज आक्रमक झाला आहे. हैदराबाद गॅझेटनुसार जुन्या नोंदींची तातडीने अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रे द्यावीत, तसेच शिंदे समितीचे काम जलद गतीने पूर्ण करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. शासनाच्या या भूमिकेविरोधात पुकारण्यात आलेल्या 'उमरखेड बंद'ला व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना सरोज देशमुख यांनी सांगितले की, आंदोलक महिला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरी जाऊन हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करतील व त्यांच्याकडे आरक्षणाचे वाण मागणार आहेत. बाळदी येथील एका व्यक्तीने केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचाही यावेळी तीव्र निषेध करण्यात आला.

या पत्रकार परिषदेला सरोज देशमुख, गणराज कदम, दिनेश रावते, शुभम माने, प्रमोद देशमुख, चांदराव सुरोशे, गजानन कोल्हे, सचिन घाडगे, आनंद शिंदे, अभय पवार, अरुण ठाकरे, गजानन जाधव, अंकुश मिराशे, बालाजी जाधव, अमोल मिराशे, श्रीकांत धाबे, गजानन वटाणे यांच्यासह तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

# आंजी परिसरात वाघाचा धुमाकूळ; गायीचा फडशा पाडला

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**राळेगाव** : तालुक्यातील आंजी गाव परिसरात वाघाने धुमाकूळ घातल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आंजी येथील सूर्यभान पिंपरे यांच्या शेतात वाघाने हल्ला करून संजय देशमुख यांच्या गायीला ठार केल्याची घटना समोर आली आहे.

गायीवर वाघाने हल्ला केल्याची माहिती मिळताच वनविभागाचे वनरक्षक सिडाम यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी घटनेची माहिती घेत पंचनामा व चौकशी केली. यावेळी चौकीदार विजय आत्राम उपस्थित होते.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर श्यामाप्रसाद मुखर्जी समितीचे अध्यक्ष निलेश पिंपरे, अमित देशमुख, विलास मुंडले, मिथुन राऊत यांच्यासह परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी भेट दिली.

आंजी परिसरात वाघाचा वावर वाढल्याने शेतात कामासाठी जाणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वाघाच्या सततच्या वावरामुळे जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने परिसरात गस्त वाढवून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## शांताबाई जाधव यांचे निधन



प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**पुसद** : 'माणुसकीची भिंत' या सामाजिक उपक्रमाचे अध्यक्ष गजानन जाधव यांच्या मातोश्री शांताबाई दत्तात्रय जाधव (वय ७५) यांचे रविवारी सायंकाळी ४:१० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले संतोष जाधव, गजानन जाधव आणि मुलगी शीलाताई वाकोडे पाटील (अकोला) असा मोठा आप्तपरिवार आहे.

स्व. शांताबाई जाधव यांच्या पार्थिवावर आज, सोमवारी (दि. १४) सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कवठात खुलेआम दारुविक्री, महिलांचा संताप



प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**सावळी सदोबा** : पारवा पोलिस स्टेशन, कवठा गावात खुलेआम दारूविक्री सुरु असल्याचा आरोप करीत या गावातील महिलांनी सावळी सदोबा पोलिस दूरक्षेत्रावर धडक दिली. दारूविक्री तातडीने बंद करून विक्रेत्यांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

गावात अनेक दिवसांपासून दारूची खुलेआम विक्री सुरू आहे. याबाबत पोलिसांना वारंवार माहिती देऊनही कारवाई होत नाही. दारू विक्रेत्यांची मुजोरी वाढली आहे. सावळी सदोबा येथील एका देशी दारू परवानाधारकाकडून मोटारसायकलद्वारे कवठा गावात दारू आणून घरपोच विक्री केली जात असल्याचा आरोपही महिलांनी केला. दारूविक्रीला मोठ्या प्रमाणात ऊत आला आहे. अनेक युतक दारूच्या व्यसनाधीन होत आहेत, दारूविक्रीमुळे गावातील वातावरण बिघडत आहे. त्यामुळे कवठा गावातील दारूविक्री तातडीने बंद करा, अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा देण्यात आला आहे.

# सावित्रीच्या लेकींच्या हातून साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## मूर्ती खरेदीतून मुलींच्या शिक्षणाला हातभार लावण्याचे आवाहन

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**यवतमाळ** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासोबतच वंचित समाजातील मुलींना स्वावलंबी बनविण्याचा अनोखा उपक्रम भोयर बायपास परिसरात राबविण्यात येत आहे. पारधी समाजातील मुलींसाठी सुरू असलेल्या 'आम्ही सावित्रीच्या लेकी' शैक्षणिक आश्रयालयातील विद्यार्थिनींनी स्वतःच्या हातांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या आहेत.

पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तींचा वापर वाढावा, तसेच या मुलींच्या कलागुणांना व कौशल्याला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. मुलींना शिक्षणासोबतच मूर्ती घडविण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. भविष्यात नोकरी किंवा खासगी संस्थांवर अवलंबून न राहता स्वतःचा रोजगार उभा करता यावा, हा प्रशिक्षणामागील प्रमुख हेतू आहे.

या मुलींनी तयार केलेल्या गणेशमूर्ती यवतमाळ शहरातील बिरसा मुंडा चौक आणि आर्णी नाका चौक येथून नागरिकांना घेऊन जाता येणार आहेत. पर्यावरणप्रेमी नागरिकांनी पुढाकार घेऊन या मूर्ती स्वीकाराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, या गणेशमूर्तींसाठी कोणतेही निश्चित शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, पारधी समाजातील मुलींना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी मदत म्हणून इच्छुक नागरिकांकडून देणगी स्वीकारली जाणार आहे. त्यामुळे गणेशमूर्ती घेताना पर्यावरण संवर्धनासोबतच एका मुलीच्या शिक्षणाला हातभार लावण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

'ही केवळ गणेशमूर्ती नसून मुलींच्या हस्तकलेचा आविष्कार आहे,' अशी भावना व्यक्त करत जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन डॉ. गायत्री काळे फाउंडेशनच्या अध्यक्षा मीना काळे, सचिव सतीश काळे तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

# सहकार क्षेत्रात 'गोदावरी अर्बन'ची उल्लेखनीय झेप

## आमदार अर्जुन खोतकर, विधिमंडळ अंदाज समितीच्या प्रमुखांची बँकेला सदिच्छा भेट !

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**यवतमाळ** : बँकिंग क्षेत्रात 'गोदावरी अर्बन'ने अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्रासह देशातील पाच राज्यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेचे मार्गदर्शक ना. हेमंत पाटील यांचे नेतृत्वात, अध्यक्ष राजश्री पाटील व व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रासह पाच राज्यात आपली स्वतंत्र ओळखच निर्माण केली नसून ग्राहकांची विश्वासार्हता जपली आहे, असे मत महाराष्ट्र विधिमंडळ अंदाज समिती (२०२५-२०२६) चे समिती प्रमुख, शिवसेनेचे उपनेते तसेच जालना विधानसभेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केले. त्यांनी येथील दत्त चौकातील 'गोदावरी अर्बन'च्या शाखेला शनिवारी (दि.१२) सदिच्छा भेट दिली. त्यानंतर बँकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीची पाहणी केली.

याप्रसंगी त्यांच्यासोबत विधान परिषद सदस्य तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष ना. हेमंत पाटील, भाजपचे जिल्हा सचिव प्रवीण कोकाटे, 'गोदावरी अर्बन'चे सहायक महाव्यवस्थापक (एजीएम) रवी इंगळे, शाखा व्यवस्थापक अमित पिंपळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. बँकेच्या वतीने एजीएम रवी इंगळे यांनी आमदार खोतकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी आमदार खोतकर यांनी येथील वीर वामनराव चौकात बांधण्यात येत असलेल्या बँकेच्या नवीन विभागीय प्रशासकीय इमारतीची पाहणी केली. त्यांनी जालना येथे सुद्धा बँकेची शाखा सुरू करून आम्हालाही सेवेची संधी द्यावी, असे उद्गार याप्रसंगी काढले. तसेच त्यांनी बँकेच्या अद्ययावत इमारतीची पाहणी करून बँकेच्या प्रगतीची माहिती जाणून घेतली. याप्रसंगी दत्त चौक शाखेतील शाखा अधिकारी आकाश चोले, कर्ज वसुली अधिकारी शीतल कदम, जनसंपर्क अधिकारी राजकुमार भीतकर आदींसह इमारतीचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार फिडेस्टो प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक विपुल गर्ग, प्रकल्प व्यवस्थापक चेतन राठोड, अभियंता ईश्वर पवार आदींची उपस्थिती होती.

# वडगाव (टीप) येथे उत्साहात पोळा साजरा

## बळीराजाच्या सर्जा-राजाची पारंपरिक पद्धतीने पूजा; गावात सणाचा उत्साह

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**वणी** : वडगाव (टीप) येथे शेतकऱ्यांचा पारंपरिक व जिव्हाळ्याचा सण असलेला पोळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वर्षभर शेतकऱ्यांच्या शेतीकामात मोलाची साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करत सर्जा-राजाची विधिवत पूजा करण्यात आली. सकाळपासूनच गावात पोळ्याच्या सणाचा उत्साह दिसून येत होता.

पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना रंगीबेरंगी झुली, गोंडे, विविध सजावटीच्या वस्तू तसेच आकर्षक दागिन्यांनी सजविले होते. बैलांना अंघोळ घालून त्यांची आकर्षक सजावट करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चना करून नैवेद्य दाखविण्यात आला. बैलांच्या कपाळावर कुंकू-हळद लावून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या सोहळ्यात शेतकरी कुटुंबांसह महिला, बालक आणि ज्येष्ठ नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. सजविलेल्या बैलांना पाहण्यासाठी ग्रामस्थांची गर्दी झाली होती. त्यामुळे संपूर्ण गावातील वातावरण आनंदी आणि उत्साहपूर्ण झाले होते.

शेती आणि शेतकरी जीवनात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आधुनिक यंत्रांचा वापर वाढला असला तरी बैलांप्रती असलेली शेतकऱ्यांची आत्मीयता आणि कृतज्ञता पोळ्याच्या माध्यमातून आजही कायम आहे. वडगाव (टीप) येथेही श्रद्धा, परंपरा आणि उत्साहाच्या वातावरणात पोळा साजरा करून ग्रामस्थांनी आपल्या कृषी संस्कृतीची परंपरा जपली.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

५

सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# भर पावसात 27 दिवसांनी विद्यार्थ्याचा मृतदेह बाहेर

## वादग्रस्त महर्षी पब्लिक स्कूल प्रकरणाला नवे वळण; राजेश बेठेकरच्या मृत्यूचे गूढ उकलणार?

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**अमरावती :** अमरावती शहरातील वादग्रस्त महर्षी पब्लिक स्कूल आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी राजेश बाबू बेठेकर याच्या मृत्यूला तब्बल २७ दिवस उलटल्यानंतर शनिवारी सायंकाळी भर पावसात त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. चिखलदरा पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेह बाहेर काढून त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. या कारवाईमुळे राजेशच्या मृत्यूचे नेमके कारण काय, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

16 ऑगस्ट रोजी राजेश बाबू बेठेकर या विद्यार्थ्याचा मृत्यू शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचा आरोप त्याच्या पालकांनी केला होता. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्नातून विषबाधा झाल्याचाही आरोप करण्यात आला होता. या गंभीर प्रकरणानंतर शाळा प्रशासनाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते.

घटनेनंतर तब्बल २७ दिवसांनी पोलिसांनी मृतदेह बाहेर काढण्याची कारवाई केली. शनिवारी सायंकाळी सुरू असलेल्या मुसळधार पावसाची पर्वा न करता ही कारवाई करण्यात आली. मृतदेह बाहेर काढल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले. यावेळी चिखलदरा तहसीलदार, चिखलदरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार तसेच चिखलदरा तालुका वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच मृत विद्यार्थ्याचे नातेवाईक आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मृतदेह बाहेर काढण्यात येणार असल्याची माहिती मिळताच गावातील नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती.

दरम्यान, या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था, पिण्याचे पाणी, निवास व्यवस्था, शालेय गणवेश व कपडे तसेच औषधोपचाराच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्याचे प्रशासनाच्या पाहणीत समोर आले होते. अमरावतीचे अपर आदिवासी विकास विभागाचे आयुक्त संदीप गोलाईत यांनी महर्षी पब्लिक स्कूल आदिवासी आश्रमशाळेची पाहणी केली होती. या पाहणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या भोजनासह पिण्याचे पाणी, निवास, गणवेश आणि आरोग्य सुविधांबाबत अनेक त्रुटी आढळल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने शाळेतील खानावळीला टाळे ठोकले होते. राजेश बेठेकर यांच्या मृत्यू प्रकरणी त्यांच्या पालकांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर संबंधित घटनेची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी पोलिसांना दिले होते.



दर्यापूर तालुक्यात परतीचा जोरदार पाऊस, नागरिकांच्या चेहऱ्यावरील फुलले हास्य.

# उत्कृष्ट गणेश मंडळांचा जिल्हास्तरीय गौरव

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्ह्यामध्ये दि. १४/०९/२०२६ रोजी गणेश स्थापना हर्ष उल्हासाने साजरी होणार असून जिल्ह्यात १५०९ संख्येने गणपती स्थापना होणार आहे. त्यात एक गांव एक गणपती ३९१ आहेत त्या अनुषंगाने गणेशोत्सव अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित, पर्यावरणपूरक, सामाजिक बांधिलकी जपणारा आणि पारंपरिक संस्कृतीला प्रोत्साहन देणारा व्हावा, या उद्देशाने अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने उत्कृष्ट गणेश मंडळांची निवड करून जिल्हास्तरावर प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

उत्कृष्ट गणेश मंडळांची निवड १०० गुणांच्या निर्धारित मूल्यांकन पद्धतीनुसार करण्यात येणार असून, पोलीस विभाग, स्थानिक प्रशासन/पालिका आणि सामाजिक/नागरिक प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत मूल्यांकन केले जाईल.

मूल्यांकनामध्ये कायदा व सुव्यवस्था, सुरक्षा व वाहतूक व्यवस्थापन, सामाजिक बांधिलकी व लोकसहभाग, "ऑपरेशन कवच जनजागृती", पर्यावरणपूरक गणेशोत्सव व स्वच्छता, व्यसनमुक्ती व सामाजिक प्रबोधन, पारंपरिक वाद्ये/No Dolby, सांस्कृतिक व ऐतिहासिक मूल्य तसेच नागरिक सुविधा व सर्वसमावेशकता या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये "ऑपरेशन कवच जनजागृती" या निकषांतर्गत महिला व बालकांच्या सुरक्षेबाबत जनजागृती, सायबर गुन्हे प्रतिबंध व डिजिटल सुरक्षा, अमली पदार्थविरोधी संदेश, ११२ व पोलीस मदत क्रमांकाचा प्रसार, रस्ता सुरक्षा व हेल्मेट वापराबाबत जनजागृती तसेच नाविन्यपूर्ण सामाजिक जनजागृती उपक्रमांना गुण देण्यात येतील.

# शहरात 15 दिवस निर्बंध ; गणेशोत्सव आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी काढले आदेश

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अमरावती:** अमरावती शहर आणि परिसरात आगामी गणेशोत्सव, मोर्चे आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 36 अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश 14 सप्टेंबर 2026 च्या मध्यरात्री पासून ते 28 सप्टेंबर 2026 रोजी पर्यंत लागू राहतील.

या आदेशानुसार, अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांच्या अंमलदारांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कसे वागावे, मिरवणुका कोणत्या मार्गाने व कोणत्या वेळी काढाव्यात, याचे अधिकार पोलिसांना राहतील. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर गाणी गाणे, ढोल-ताशे व इतर कर्कश वाद्ये वाजविण्यावर पोलिसांचे नियंत्रण असेल.

सर्व मिरवणुका,जमाव आणि पूजा-अर्चनेच्या ठिकाणी रस्त्यावर वाहतुकीस अडथळा होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. आदेशाच्या कालावधीत पोलीस आयुक्तालय परिसरात मिरवणुका, मोर्चे, निदर्शने, सभा किंवा पदयात्रा आयोजित करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याची किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. यामध्ये तारीख, वेळ, जागा, मार्ग आणि दिल्या जाणाऱ्या घोषणांची माहिती आधीच निश्चित करावी लागेल. गणेशोत्सव स्थापना मिरवणूक किंवा शोभायात्रेत केवळ महोत्सवाला साजेशा घोषणा देता येतील. शांतता व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या घोषणा देण्यास पूर्ण बंदी असेल.

14 सप्टेंबरपासून सुरू होणारा गणेशोत्सव आणि 25 सप्टेंबर रोजी असणारी अनंत चतुर्दशी यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात जनसमुदाय एकत्र येणार आहे. यासोबतच, बेमुदत उपोषण,अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी आंदोलन, तसेच मराठा-ओबीसी व आदिवासी-धनगर आरक्षणाचा संवेदनशील मुद्दा आणि सध्याच्या राजकीय घडामोडी पाहता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी हे खबरदारीचे पाऊल उचलण्यात आले आहे.

हा आदेश लग्नप्रसंग आणि प्रेतयात्रेला लागू असणार नाही. मात्र, इतर कोणत्याही व्यक्तीने या आदेशाचे उल्लंघन केल्यास, तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 134 प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असे या आदेशात सांगण्यात आले आहे.

# सोनोरा भिलटेक येथील घरफोडीचा पर्दाफाश

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**अमरावती** :स्थानिक गुन्हे शाखा अमरावती (ग्रा) यांनी कारवाई करून सोनोरा भिलटेक येथील घरफोडीचा पर्दाफाश केला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी चोरी घरफोडी, जबरी चोरी, दरोडाचे गुन्हे स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामिण येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करून सदर गुन्हे उघड करण्याबाबत सुचना निर्गमीत केल्या होत्या. त्यानुसार स्था. गु. शाखा अमरावती ग्रा च्या पथकाने सोनोरा येथील घरफोडी समांतर तपास करत असताना दि. 04/03/2026 ते 06/03/2026 दरम्यान ग्राम सोनोरा भिलटेक, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे फिर्यादी यांच्या घरी त्यांची आजी एकटी असताना 3 अज्ञात इसमांनी घराच्या मागील भिंतीवरून घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याचे दागिने चोरी करून नेले होते. याबाबत पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथे अप.क्र. 77/2026, कलम 305 (अ), 331(4) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती तसेच उपलब्ध पुराव्यांच्या आधारे गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करण्यात आले. गुन्ह्यातील आरोपी चेतन नरेंद्र चव्हाण, वय २५ वर्षे, याचा शोध घेऊन त्यास भोसरी MIDC, पिंपरी-चिंचवड, पुणे येथून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्याची गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने इतर साथीदारांच्या संगनमताने सदर चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्ह्यातील आरोपी क्र.2 ते 4 यांना चांदूर रेल्वे येथून ताब्यात घेण्यात आले. चोरी केलेले सोने आरोपी रोहित रवी इमले याने सोनाराकडे विक्री करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, विना पावतीचे सोने स्वीकारण्यास सोनाराने नकार दिल्याने चोरीच्या सोन्याचा गोळा तयार करण्यात आला होता. तपासादरम्यान सदर 8.940 ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोळा, किंमत अंदाजे ₹1,28,000/- तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, किंमत अंदाजे ₹70,000/- असा एकूण ₹1,98,000/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# पवित्र पोर्टल शिक्षक भरतीत अस्पष्टता

## अमरावती ZP CEO यांचा मनमानी कारभार? जाहिरातीत उल्लेख नसलेली बदलीची अट नियुक्ती आदेशात!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्हा परिषद अमरावतीच्या पवित्र पोर्टलमार्फत करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत पेसा व बिगर पेसा पदांबाबत तसेच नियुक्तीनंतरच्या बदलीच्या नियमांबाबत उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या भरती जाहिरातीत संबंधित पदे पेसा क्षेत्रातील आहेत अथवा पेसा क्षेत्रातील पदावर नियुक्ती झाल्यानंतर विशेष बदली निर्बंध लागू राहतील, याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आला नसल्याचा उमेदवारांचा आरोप आहे.

भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर उपलब्ध असलेल्या पदांच्या आधारे अर्ज करून पसंतीक्रम भरला. मात्र, निवडीनंतर सर्व उमेदवारांना पेसा क्षेत्रातील पदांवर नियुक्ती देण्यात आली असून, नियुक्ती आदेशामध्ये पेसा क्षेत्रासाठी नियुक्ती झाल्याने अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुका वगळता इतर तालुक्यात बदली मागता येणार नाही, अशी अट नमूद करण्यात आली आहे. यामुळे उमेदवारांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, जर या नियुक्तीमुळे भविष्यातील बदलीवर इतका महत्त्वाचा निर्बंध लागू होणार होता, तर त्याचा स्पष्ट उल्लेख भरतीच्या जाहिरातीत व पवित्र पोर्टलवरील पदांच्या माहितीत आधीच का करण्यात आला नाही? उमेदवारांच्या मते, अशा महत्त्वाच्या सेवा अटीची माहिती उमेदवारांना अर्ज करण्यापूर्वीच स्पष्ट असणे आवश्यक होते. विशेषतः खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना पेसा क्षेत्रातील पदांवर नियुक्ती मिळाल्यानंतर त्यांच्या भविष्यातील बदलीच्या संधींबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पेसा क्षेत्रातील नियुक्ती म्हणजे आयुष्यभर पेसा क्षेत्रातच सेवा करावी लागणार का, तीन वर्षांनंतर नियमित शिक्षक झाल्यानंतर बदलीचे नियम काय असतील, तसेच धारणी व चिखलदरा या दोन पेसा तालुक्यांमध्ये जीवन कसे काढावे, असे प्रश्न उमेदवारांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.

उमेदवारांचे म्हणणे आहे की, भरतीच्या जाहिरातीत स्पष्ट माहिती न देता नियुक्ती आदेशाच्या वेळी नवीन किंवा अधिक कठोर अट समोर आल्याने उमेदवारांच्या पसंतीक्रमाच्या निर्णयावर परिणाम झाला आहे. त्यामुळे जाहिरात, पवित्र पोर्टलवरील पदांची माहिती आणि नियुक्ती आदेशातील अटी यामध्ये सुसंगती असणे आवश्यक आहे.

# गणेशोत्सवासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांचा बंदोबस्त

## 1509 गणपतींची होणार स्थापना

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्ह्यात सोमवारी, दि. 14 सप्टेंबर 2026 रोजी गणेश स्थापना होणार आहे. यावर्षी जिल्ह्यात एकूण 1 हजार 509 श्री गणेश मूर्तींची स्थापना केली जाणार असून, यामध्ये 391 ठिकाणी 'एक गाव एक गणपती' उपक्रमांतर्गत बाप्पा विराजमान होणार आहेत. या गणेशोत्सवासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांचा चोख बंदोबस्त राहणार आहे.

गणेशोत्सव शांततेत आणि भयमुक्त वातावरणात पार पडावा यासाठी अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात वरिष्ठ अधिकारी व अंमलदार 1, अपर पोलीस अधीक्षक, 6 उपविभागीय पोलीस अधिकारी, 20 पोलीस निरीक्षक, 117 सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि 1 हजार 700 पोलीस अंमलदार बंदोबस्तासाठी तैनात राहतील. तसेच 3 दंगा नियंत्रण पथके आणि 1 जलद प्रतिसाद पथक सज्ज ठेवण्यात आले आहे. नाशिक, अकोला, नागपूर, रेल्वे पोलीस आणि एसआरपीएफची 1 कंपनी व 1 प्लाटून अतिरिक्त तैनात केली आहे. त्यासोबत 650 पुरुष आणि 150 महिला होमगार्डचे जवान या बंदोबस्तात सहभाग घेणार आहेत.

ध्वनी प्रदूषणाचा त्रास होऊ नये म्हणून डॉल्बी व डीजे चालकांना कायदेशीर ध्वनी मर्यादेचे पालन करण्याचे स्पष्ट निर्देश पोलीस अधीक्षक यांनी दिले आहेत.

# गणेश उत्सव काळात शहरात शांतता राखण्याचे आवाहन

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

## पोलिसांनी घेतला आढावा

**अमरावती :** महाराष्ट्रात सर्वत्र गणेशोत्सव व दुर्गोत्सव 2026 साजरा करण्यात येणार आहे, दिनांक 14.09.2026 रोजी श्रींची स्थापना होणार असून दिनांक 25.09.2026 ते 28.09.2026 दरम्यान श्रींचे विसर्जन होणार आहे.

त्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर अधिक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, गणेशोत्सव 2026 दरम्यान उपद्रवी तसेच सराईत गुन्हेगारांकडुन कोणताही उपद्रव होणार नाही, गणेशोत्सव व आगामी सण उत्सव हे शांततेत पार पाडणे करीता पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ 1 या मधील पोलीस ठाणे गाडगेनगर, नागपुरी गेट, वलगांव व फ्रेजरपुरा, नांदगांव पेठ व बडेनरा या हद्दीतील गंभीर गुन्हे व जातीय तेढ वाढविणारे गुन्हेगार यांना कलम 163 (2) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 मधील तरतुदीनुसार एकुण 174 ईसमांना श्री. गणेशोत्सवाच्या संपूर्ण कालावधी साठी अमरावती शहर व परिसरातुन तडीपार करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम मधील तरतुदीनुसार 32 आरोपींना 2 वर्षासाठी अमरावती शहर व जिल्हयातुन तडीपार करण्यात आले आहे. तडीपार व्यक्ती हे संबंधित पोलीस ठाणे हद्दीत मिळुन आल्यास त्यांचेवर विहीत कायदयानुसार कारवाई प्रतिबंध करण्याची तजविज ठेवलेली आहे.

या कारवाईचा प्रमुख उददेश अमरावती शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना प्रतिबंध करणे व सराईत गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि सर्व सामान्यांना भयमुक्त व सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे हा आहे. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर सातत्याने लक्ष ठेवून यापुढेही कठोर प्रतिबंधात्मक व कायदेशिर कारवाई करण्यात येईल. सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

# विभागीय आयुक्त कार्यालयात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतार दिन साजरा



**अमरावती :** विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे महानुभाव पंथाचे प्रवर्तक, समाजसुधारक व तत्त्वज्ञ भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा अवतार दिन श्रद्धापूर्वक साजरा करण्यात आला. यावेळी श्रीचक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्याची, समाजसुधारणेतील योगदानाची तसेच त्यांच्या मानवतावादी विचारांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. त्यांच्या विचारांचा महाराष्ट्राच्या लोकजीवनावर मोठा प्रभाव पडला असून, महानुभाव साहित्याच्या माध्यमातून त्यांचे विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचले आहेत. 'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य चरित्रग्रंथ त्यांच्या कार्याचा महत्त्वपूर्ण वारसा मानला जातो. श्रीचक्रधर स्वामी यांचे जीवन हे मानवता, समानता, ज्ञान, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारे प्रेरणादायी कार्य असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यात 'श्रीगणेश आरोग्याचा' उपक्रम व्यापक स्तरावर

## श्रीगणेशा आरोग्याचा! गणेशोत्सव मंडळांच्या सहभागातून आरोग्य शिबिरे; 'आरोग्याची लोकचळवळ' उभारण्याचा संकल्प

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अमरावती:** गणरायाच्या आगमनासोबतच समाजामध्ये आरोग्याचा जागर करण्याच्या उद्देशाने 'श्रीगणेश आरोग्याचा' हा अभिनव उपक्रम अमरावती जिल्ह्यात व्यापक स्तरावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांच्या समन्वयाने हा उपक्रम लोकचळवळीचे स्वरूप घेणार आहे.

माननीय सचिवालयाच्या निर्देशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात 'श्रीगणेश आरोग्याचा' हा उपक्रम उत्स्फूर्तपणे राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर अमरावती जिल्ह्यातही गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'आरोग्य सर्वांसाठी' हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्था, जिल्हा श ल्य चि कि त्स क यां च्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्था, महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्था, धर्मादाय संस्थांतर्गत नोंदणीकृत रुग्णालये तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी व आयुष्मान भारत योजनेशी संलग्न रुग्णालये सक्रियपणे सहभागी होणार आहेत.

### जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियोजनाला गती

माननीय निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबंधित अधिकारी तसेच आरोग्य विभागातील वरिष्ठ अ धि का ऱ्यां ना 'श्रीगणेश आरोग्याचा' उपक्रमाबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक संबंधित आरोग्य संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य शिबिरांचे नियोजन करून त्याचा आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

"श्रीगणेश आरोग्याचा हा केवळ शिबिरांचा उपक्रम नाही, तर आरोग्याची लोकचळवळ व्हावी"

याबाबत बोलताना माननीय जिल्हाधिकारी श्री. आशिष येरेकर म्हणाले, "संपूर्ण राज्यात ज्या उत्साहाने आणि भावनेने 'श्रीगणेश आरोग्याचा' हा उपक्रम राबविला जात आहे, त्याच उत्साहाने अमरावती जिल्ह्यातही हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित आरोग्य संस्थांना या उपक्रमात सहभागी होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्याने विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा केवळ आरोग्य शिबिरांचा उपक्रम न राहता, नागरिकांच्या सहभागातून उभी राहणारी 'आरोग्याची लोकचळवळ' म्हणून हा उपक्रम पुढे यावा, हा आमचा संकल्प आहे."

'श्रीगणेश आरोग्याचा' या उपक्रमाच्या माध्यमातून गणरायाच्या भक्तीसोबत आरोग्याची जाणीव, तपासणीची सवय आणि निरोगी जीवनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

### गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्याने आरोग्य शिबिरांचे आयोजन

» जिल्ह्यातील विविध गणेशोत्सव मंडळांशी समन्वय साधून त्यांच्या कार्यक्षेत्रात आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी, विविध आजारांचे प्राथमिक निदान, आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच पात्र नागरिकांना विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती देण्यात येणार आहे. या माध्यमातून आरोग्यसेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्यासोबतच आजारांचे वेळेवर निदान आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबाबत जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







बातमी खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट



# रिल्सचे प्रकरण नाममात्र, सर्वच प्रकरणाच्या चौकशीचे सत्र, सचिवाचे आयुक्तांना पत्र !



## तहसीलदाराच्या अडचणीत वाढ, अव्वर सचिवांकडून विभागीय आयुक्तांना चौकशीचे आदेश

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी कार्यालयात सिनेमॅटिक रील शूट करून स्वतःच्या अकाउंटवर प्रसिद्धी साठी प्रसारित केली होती. मात्र रिल्सचे प्रकरण नाममात्र असून त्यांच्या कार्यकाळातील सर्वच प्रकरणाच्या चौकशी करण्याचे आदेश अव्वर सचिव महसूल विभागाकडून विभागीय आयुक्तांना चौकशीचे आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे रिल्स स्टार तहसीलदार तेजनकरांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वाशिम जिल्ह्यातील रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी तहसील कार्यालयात सिनेमॅटिक रील शूट केल्या प्रकरणी व त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या संपूर्ण कारभाराची चौकशी करण्याचे आदेश काढण्यात आले आहे. त्यामुळे तेजनकर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. महसूल विभागाचे अव्वर सचिव प्रवीण पाटील यांनी विभागीय आयुक्तांना चौकशीचे आदेशाचे पत्रही दिले आहे.

तेजनकर यांनी शासनाच्या सोशल मीडिया संदर्भातील नियमांचा भंग करून ही रील शूट केली आणि शासकीय पदाचा गैरवापर करत स्वयंप्रसिद्धी केली होती. प्रतीक्षा तेजनकर यांची केवळ रील प्रकरणीच नाही तर त्यांनी रिसोड येथे तहसीलदार म्हणून पदावर कार्यरत असतांना केलेल्या संपूर्ण प्रशासकीय कामकाजाची विशेष पथकामार्फत तपासणी करून अहवाल पुढील एक महिन्याच्या आत शासनास सादर करावा, अश्याही सूचना देण्यात आल्या आहेत .या आदेशामुळे जिल्ह्यातील महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे त्यांच्या मालमत्तेचीही चौकशी करण्याची मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत आहे.

### काय आहे प्रकरण अन् आदेशाचे धोरण...

*केवळ रील प्रकरणाचीच नव्हे तर तहसीलदार म्हणून केलेल्या संपूर्ण कारभाराची होणार चौकशी.

*चौकशीसाठी विशेष पथक गठीत करण्याचे निर्देश.

*केवळ बातम्यांमुळे नव्हे तर बेजबाबदारपणे रील काढल्याचे शासनाच्या निदर्शनास आले

* महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोरही ठेवण्यात आला होता रील प्रकरणाचा अहवाल.

* इतर अधिकाऱ्यांनी यातून धडा घ्यावा यासाठी कडक कारवाईची नागरिकांकडून अपेक्षा.

### पैसे न घेता काम झालेली व्यक्ती दाखवा, अन् बक्षीस मिळवा...

संविधानाने दिलेल्या अधिकाराचा योग्यरित्या वापर करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे तहसीलदाराचे कार्य आहे. तसेच महसूल विभागाचा कारभार सांभाळत असताना प्रशासनाने तहसीलदाराला तालुका दंडाधिकारी म्हणूनही अधिकार प्रदान केले आहेत. तालुका दंडाधिकारी म्हणजेच न्यायदानाचे कार्य सुद्धा तहसीलदाराकडे प्राप्त झालेले आहे. आपल्या पदाची प्रतिष्ठा सांभाळण्याचीसुद्धा जबाबदारी प्रत्येक अधिकाऱ्याची असते. मात्र त्यांच्याच कार्यालयात सर्वसामान्यांची कामे पैसे दिल्याशिवाय होत नाहीत. त्यामुळे सहजासहजी काम झालेली व्यक्ती दाखवा अन् बक्षीस मिळवा असे म्हणण्याची वेळ आली आहे. तहसील कार्यालयातील सर्वच अधिकारी व कर्मचारी दलालामार्फत आर्थिक देवाण घेवाण करूनच सर्वसामान्यांचे काम करीत असल्याच्या तक्रारी आहेत.

### वसुलीसाठी सर्व एकत्र, दलालांच्या हातात सुत्र...

चांगले काम करणारे अधिकारी जनतेच्या मनात स्थान निर्माण करतात. जनताही त्यांच्यासाठी वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरते. आणि ते जनतेच्या मनातील रियल स्टार बनतात. रिसोड तहसील कार्यालयातील दलालांचा सुळसुळाट झाला आहे. कोणतेही काम करण्यासाठी दलालांचाच आधार घ्यावा लागतो. पैशाशिवाय अन् दलालांच्याशिवाय काम होत नसल्यामुळे जनता त्रस्त झाली आहे. त्यामुळे रील ऐवजी तहसील कार्यालय दलालाच्या वसुली मुक्त करून रियल स्टार बनण्याची गरज आहे. तहसीलदारांना जवळच्याच दललांनीच बदनाम केले आहे.

## थोडक्यात

### खुनाचा प्रयत्न प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी वाशिम पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९(१), ३५२ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी दत्ता उगले याला जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दत्ता उगले याच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप असून त्याला २७ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर ९ सप्टेंबर रोजी त्याच्या जामिनासाठी जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला. आरोपीच्या जामिनासाठी ॲड. सुरजभाऊ भगत यांनी बाजू मांडली. न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान ॲड. भगत यांनी केलेल्या युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपी दत्ता उगले याचा जामीन अर्ज मंजूर केला.

### मानोरा पो.स्टे.च्या ठाणेदार नयना पोहेकर यांचा सत्कार




• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मानोरा येथील पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक नयना पोहेकर मॅडम यांनी वृद्ध कलावंत सदस्य पदी निवड झाल्याबद्दल सन्माननीय खंडेराव मुंडे यांची व सिटी न्यूज सुपरफास्ट चे प्रतिनिधी रमेश मुंजे यांचा सन्मानपूर्वक पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला यावेळी त्यांनी गणेश उत्सवानिमित्त शुभेच्छा सुद्धा दिल्या.

## जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीची तात्काळ पाहणी करा

### पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रशासनाला तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •





पावसातील खंड आणि कमी पावसामुळे वाशिम जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिके, पाणी व चारा उपलब्धतेची पाहणी करून तातडीने वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. यामध्ये पिकांची सद्यस्थिती, पेरणीची वेळ, शेवटचा झालेला पाऊस, पावसातील खंड, जमिनीतील ओलावा तसेच पिकांना उपलब्ध असलेले पाणी याची माहिती घेण्यात येईल. यासोबतच गावांमधील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी चारा व पाण्याची स्थिती याचाही आढावा घेण्यात येणार आहे. पाहणीदरम्यान शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी व परिस्थितीची माहिती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**सर्व तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष पाहणी**

दुष्काळसदृश्य परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी यांच्यासह तालुक्यातील प्रांताधिकारी, तहसीलदार तसेच महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. कमी पाऊस आणि पावसातील खंडामुळे ज्या भागांतील पिकांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशा गावांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. पाहणीअंती प्राप्त अहवालांच्या आधारे शासनाच्या निकषांनुसार आवश्यक ती कार्यवाही करून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणींचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात आणि शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत.

## मुंगळा शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी स्वाती भांदुर्गे

• सिटी न्युज ब्युरो @ केनवड •



मुंगळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले असून, अध्यक्षपदी सौ. स्वाती दत्ता भांदुर्गे तर उपाध्यक्षपदी श्री. पवन लक्ष्मण राजेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नूतन समितीच्या माध्यमातून शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक, शिक्षक व ग्रामस्थांना सोबत घेऊन विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

सदस्य निवडीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्षांची बिनविरोध निवड करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी संतोष विठ्ठल भांदुर्गे, सागर गणेश आघाव, वैशाली स्वप्नील वानखेडे, योगेश किसन राऊत, निर्मला दिलीप शेळके, सौ. शालिनी शिवाजी भांदुर्गे, धनंजय विठ्ठल बकाळ, सौ. कावेरी पंकज डोंगरे व महादेव आनंदा पवार यांची निवड झाली. विविध उपक्रम राबविण्यासाठी समितीच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील,' असे सांगितले. मागील शाळा व्यवस्थापन समितीने दिलेल्या सहकार्याबद्दल मुख्याध्यापक रवी टाले यांनी आभार व्यक्त केले.

## डॉ. विशाल गौतम खडसे यांना पीएचडी पदवी प्रदान

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थी विशाल गौतम खडसे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडून प्राणीशास्त्र विषयात आचार्य (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांनी बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड येथील पीएचडी मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. वर्षा जयशिंगपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. हे संशोधन मिलिया आर्ट्स, सायन्स आणि मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड येथील संशोधन केंद्रात करण्यात आले. या संशोधनात गोड्या पाण्यातील माशांमध्ये आढळणाऱ्या णूद्ा ईंगू या परोपजीवी प्रजातीतील जिवांचा अभ्यास करण्यात आला असून, गोड्या पाण्यातील माशांवर होणाऱ्या प्रादुर्भावामुळे मत्स्यव्यवसायामध्ये होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. या अभ्यासामुळे मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष लाभ होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.



संशोधन काळात त्यांना संशोधन मार्गदर्शक डॉ. वर्षा जयशिंगपुरे, प्राचार्य डॉ. मोहम्मद इलियास फाझील, संशोधन केंद्र प्रमुख डॉ. शेख फिरोज इलियास, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मोहम्मद इलियास फाझील तसेच प्राध्यापक डॉ. प्रदीपकुमार पाटील, डॉ. हेमंतकुमार वंजारी, डॉ. शेषराव राठोड, डॉ. सचिन तायडे, डॉ. रवि खाडे, डॉ. महेश तांदळे, डॉ. किशोर सवाईकर, डॉ. सुशील देशमुख, डॉ. संगीता छाबा, डॉ. जया सोमटकर, डॉ. अभिमन्यू उदगीरे, तुळशीराम वारेकर, यांचे विशेष सहकार्य लाभले.. तसेच वडील गौतम श्रावण खडसे, आई आशाताई गौतम खडसे, मोठे भाऊ आशीर्वाद गौतम खडसे, लहान भाऊ सागर गौतम खडसे , तसेच सहकारी मित्र अमोल ठोसर, आकाश ठाकरे, ज्ञानेश्वर भुतेकर, हर्षवर्धन श्रृंगारे, प्रतिक वानखेडे, सचिन इढोळे, शिवराज इढोळे, क्षमता पवार, मानसी निर्बाण, ओम तनपुरे यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## सणासुदीच्या पार्श्वभूमीवर...

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिम शहरात सणासुदीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शहरातील पाटणी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मुख्य मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून नागरिक आणि वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. तर लक्झरी स्टॅन्ड ,बस स्टॅन्ड, पोस्ट ऑफिस चौक, पोलीस स्टेशन चौक या मार्गावर भर रस्त्यावर खाजगी लक्झरी बस उभे राहत असल्याने या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे .त्यामुळे याकडेही लक्ष देवून या वाहनांवर कारवाई करून उपाय योजना करण्याची मागणी होत आहे.

## शहरातील चौक मोकाट, वाहतूक पोलीस गायब !

### *पाटणी चौक ते बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गावर वाहतूक विस्कळीत







वाशिम शहरात सणासुदीच्या खरेदीसाठी नागरिकांची बाजारपेठेत मोठी गर्दी होत असताना वाहतूक नियंत्रणासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी मात्र रस्त्यावर दिसत नाही. दि. १३ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात वाहतूक विस्कळीत होवून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र या ठिकाणी एकही वाहतूक पोलीस कर्मचारी उपस्थित नसल्याचे दिसून आले. तर पाटणी चौकात वाहतूक सुरळीत करण्यासाठी केवळ एकच कर्मचारी कार्यरत होता. दरम्यान, आंबेडकर चौक ते पाटणी चौक या मार्गावर वाहतूक वारंवार विस्कळीत होत असून किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत आहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडी वाढत असताना काही ठिकाणी वाहतूक पोलीस अनुपस्थित राहतात, तर काही कर्मचारी मोबाईलवर बोलण्यात व्यस्त राहतात .तसेच बस स्टँण्ड, लॅक्झरी स्टॅण्ड अकोला नाका या मुख्य मार्गावर भर रस्त्यात लक्झरी बस उभे राहत आहे. एखादा फेरीवाला जर या रस्त्यावर दिसून आला तर त्याचा काटा हिसकावून घेतला जातो ,अन् कारवाई केली जाते. मात्र मुख्य मार्गावर मोठ मोठी लक्झरी बस या ठिकाणी उभी असतांना याकडे आर्थिक दुर्लक्ष केला जात असल्याचा आरोप नागरिक करीत आहे. यामुळे ड्युटीवर अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आणि भर रस्त्यावर उभे राहणाऱ्या लक्झरी बसेसवर कारवाई करावी. तसेच सणासुदीच्या काळात अतिरिक्त वाहतूक पोलीस तैनात करून शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक आणि वाहनधारकांकडून करण्यात येत आहे.

## नाट्य परिषद शाखा मानोराची विशेष सभा

• सिटी न्युज ब्युरो @ मानोरा •

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा मानोरा - मालेगाव ची विशेष सभा रविवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता पंचायत समितीच्या वसंतराव नाईक सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेत विविध विषयावर चर्चा करून सभा उत्साहात पार पडली.

सभेच्या अध्यक्षस्थानी शाखेचे अध्यक्ष डॉ संजय रोठे होते. प्रमुख अतिथी म्हणून शाखेचे प्रमुख कार्यवाह यशवंत पद्मगिरवार, शाखेचे कोषाध्यक्ष माणिक डेरे, उपाध्यक्ष जगदीश जोशी, वृद्ध कलावंत समितीचे जिल्हा सदस्य खंडेराव मुंढे, रमेश मुंजे उपस्थित होते. नटराज पूजन आणि स्तवन करून सभेला सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक प्रमुख कार्यवाह यशवंत पद्मगिरवार यांनी केले. त्यांनी वर्षभरातील जमाखर्च, कार्यक्रमाचे आयोजन, पुढील नियोजन याबाबत माहिती दिली. या सभेत ६ ऑक्टोबर रोजी शाखेच्या वर्धापन दिना निमित्त एक दिवसीय नाट्य महोत्सव आणि कलावंत मेळावा व विविध कला महोत्सव घेण्या बाबत चर्चा करून नियोजन करण्यात आले. तसेच इतर विषयावर चर्चा करण्यात आली. वृद्ध कलावंत समितीवर खंडेराव मुंढे यांची निवड झाल्या बद्दल त्यांचा शाखेच्या वतीने सत्कार घेण्यात आला. यांनी यावेळी सांगितले की वृद्धकलावंतावर निवड प्रक्रियेमध्ये कुठल्याही प्रकारे अन्याय होणार नाही निवड हे पारदर्शकपणे होईल. असे म्हणाले तसेच माणिक डेरे, डॉ संजय रोठे यांनी मनोगत व्यक्त केले. संचलन आनंद खुळे यांनी तर. किरण पद्मगिरवार यांनी आभार मानले. सभेला गजानन घुबडे, गजानन कोल्हे, मोहन खुपसे, नारायण खाडे, नारायण इंगोले, पंडित राठोड, आर.बी. सोनिवाल, रामहरी भवाळ, गोपाल इंगोले, शामराव राऊत, ताई इसलकर आदी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची कामगार मंत्री आकाशदादा फुंडकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यात पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मागील ४५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी बांधव संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री मा. ना. श्री. आकाशदादा फुंडकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून संपूर्ण बुलढाणा जिल्हा व खामगाव तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली आहे.

# जिल्ह्यातील दिव्यांगांचे प्रश्न सोडवा !

## कलीम शेख यांचे निवेदन

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**मलकापुर :** अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे राज्य सचिव कलीम शेख यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देतेवेळी चर्चा करून सांगितले की बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग कल्याण ५त्न राखीव निधी, दिव्यांग तपासणी बोर्ड, घरकुल, रोजगार व इतर योजनांमध्ये होणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता चर्चा सत्राचे आयोजन करणे गरजेचे आहे बाबत.शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेताना आम्हाला खालीलप्रमाणे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना: अनेक पात्र दिव्यांगांचे अर्ज महिनोंनमहिने प्रलंबित आहेत. थकीत अनुदान त्वरित वितरित करावे. नवीन अर्जाची प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करावी.पाच तसेच टक्के दिव्यांग कल्याण राखीव निधी जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायत व पंचायत समिती ग्रामपंचायत यांच्याकडे दिव्यांगांसाठी असणारा पाच टक्के दिव्यांग कल्याण निधी खर्च होत नाही. हा निधी कोणत्या आधारावर आहे बजेट किंवा वसुली हे स्पष्ट होत नाही . काही स्वराज्य संस्था मनमानी करून अत्यल्प तरतूद करून त्यामध्ये भ्रष्टाचार करतात. आणि काही ठिकाणी हे निधी खर्च होत नाही सदर निधीचा शंभर टक्के वापर दिव्यांगांच्या कल्याणासाठी व्हावा.त्याचप्रमाणे विविध शासकीय समित्याः जसे जिल्हा व तालुका स्तरावरील विविध समित्यांमध्ये दिव्यांग प्रतिनिधींना समाविष्ट करून घेतले जात नाही. त्यामुळे आमच्या समस्या शासन दरबारी मांडल्या जात नाहीत. प्रत्येक समितीमध्ये किमान १ दिव्यांग प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावे जेणेकरून होणारा भ्रष्टाचार थांबेल आणी घरकुल योजना जिल्हाभरातील अनेक दिव्यांगांना घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नाही पात्र दिव्यांगांना प्राधान्याने घरकुल मंजूर करावे. ज्या दिव्यांगांजवळ जागा उपलब्ध नाही अशा दिव्यांगांना प्रथम जागा उपलब्ध करून देऊन घरकुल देण्यात यावे.तसेच अनेक गरजू दिव्यांग कुटुंब अंतोदय योजनेचे वाटेवर आहे त्यांचे अर्ज निकाली करण्यात यावे त्याचबरोबर रोजगार व स्वयंरोजगार करीता दिव्यांगांसाठी शासकीय प्रशासकीय इमारतींमध्ये २०० स्क्वेअर फूट जागा उपलब्ध करून देण्यात यावी. ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद व समाज कल्याण विभागांतर्गत उभारलेले व्यापारी गाळे, छोटे-मोठे स्टॉल व स्वस्त धान्य दुकान आधार केंद्र सेतू केंद्र विविध परवाने देताना दिव्यांगांना ५त्न आरक्षण मिळत नाही. स्वयंरोजगारासाठी कमी व्याजदराने कर्ज व अनुदान मिळत नाही.

आपले स्तरावर जिल्ह्यातील सर्व बँकेला आदेशित करण्यात यावे रोजगार मेळावे आयोजित होत नाहीत. या सर्व बाबींची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. त्याच बरोबर दिव्यांग तपासणी बोर्डात येणाऱ्या अडचणी दूर व्हावे जिल्ह्यात बुलढाणा चिखली मलकापूर खामगाव येथे बरेच काही अडचणी निर्माण होत आहे तरी दिव्यांग तपासणी बोर्डात येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता संबंधित ऑपरेटर व अधिकाऱ्यांची बैठक लावून अडचणी दूर करण्यात यावी संघटनेने या सर्व बाबीवर वारंवार निवेदन दिले आहे परंतु आज पावते काही तोडगा निघालेला नाही म्हणून कलीम शेख यांनी निवेदन देते वेळी चर्चा करून जिल्हाधिकारी यांना नम्र विनंती केली , वरील सर्व विषयांची तातडीने दखल घेऊन संबंधित सर्व विभागांना योग्य त्या सूचना द्याव्यात. तसेच आपल्या अध्यक्षतेखाली आमच्या समस्या जाणून घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरून बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना सन्मानाने जगता येईल त्यावेळेस युनुस पुंजांनी मेकर व सय्यद आसिफ उपस्थित होते

# जिल्हा स्त्री रुग्णालयात आजपासून बालरुग्णांसाठी बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा उपलब्ध

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**बुलढाणा :** जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील बालरोग विभागाचे जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथे सोमवार १४ सप्टेंबर २०२६ पासून स्थलांतर करण्यात येणार आहे. त्यामुळे लहान मुलांसाठी बालरोग विभागाच्या बाह्यरुग्ण तसेच आंतररुग्ण सेवा जिल्हा स्त्री रुग्णालयात उपलब्ध होणार आहेत.

राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालय ही दोन्ही रुग्णालये राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिनस्त कार्यरत आहेत. रुग्णालयातील दैनंदिन वाढती रुग्णसंख्या तसेच बालरोग विभागात पदव्युत्तर एम. डी. अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या रुग्णखाटांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. भारतीय आयुर्विज्ञान आयोगाच्या (NMC) निर्धारित मानकांची पूर्तता केल्यानंतरच पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी मिळते. या पार्श्वभूमीवर बालरोग विभागाचे स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाविद्यालयाला पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा मिळण्यासाठी लवकरच भारतीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून महाविद्यालयाचे निरीक्षण करण्यात येणार आहे. या निरीक्षणादरम्यान रुग्णखाटांबाबत कोणतीही त्रुटी निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील बालरोग विभागाचा बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभाग जिल्हा स्त्री रुग्णालयात स्थलांतरित करण्यात येत आहे.

दरम्यान, नवजात बालकांसाठीचा अतिदक्षता कक्ष (NICU) सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात सुरू असून तो तूर्तास तेथेच कार्यरत राहणार आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयात नवीन NICU उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

हे काम पूर्ण झाल्यानंतर सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात कार्यरत असलेला ऋण्ळ देखील जिल्हा स्त्री रुग्णालयात स्थलांतरित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने यांनी दिली.

# सप्टेंबर महिन्यात शहरी भागातील अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना ज्वारीऐवजी मका वितरण

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**खामगाव :** जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांच्या पत्र क्रमांक अ.ना.पू./अ.का.ख./कावि-४१३/२६, दि. २ सप्टेंबर २०२६ अनुषंगाने, माहे ऑगस्ट २०२६ च्या धान्य वितरणानंतर शासकीय धान्य गोदाम, खामगाव येथे मका शिल्लक राहिलेला आहे.

शिल्लक उपलब्ध असलेल्या मक्याचा माहे सप्टेंबर २०२६ च्या धान्य वितरणासाठी उपयोग करण्याच्या अनुषंगाने, खामगाव तालुक्यातील शहरी भागातील स्वस्त धान्य दुकानांशी संलग्न असलेल्या अंत्योदय अन्न योजना व अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांसाठी ज्वारीऐवजी मक्याचे नियंत्रण मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे सप्टेंबर २०२६ महिन्याच्या धान्य वितरणामध्ये संबंधित लाभार्थ्यांना नियमानुसार ज्वारीऐवजी मका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याबाबत खामगाव तालुक्यातील शहरी भागातील सर्व संबंधित शिधापत्रिकाधारकांनी नोंद घ्यावी, असे तालुका निरीक्षण अधिकारी, खामगाव रोशनी फुलझले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. शिधापत्रिकाधारकांनी आपल्या संबंधित स्वस्त धान्य दुकानातून शासनाच्या नियमानुसार उपलब्ध होणारे धान्य प्राप्त करून घ्यावे, असेही कळविण्यात आले आहे.




आज घरोघरी गणरायाची मोठ्या उत्साहात स्थापना करण्यात आली. छोट्या बालकांनी उत्साहाने गणपती बाप्पाला घरी आणले.

# आ. संजय गायकवाडांविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल!

## 'बाप तो बाप रहेगा'वर प्रतिक्रिया देणे भोवले, बुलडाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**बुलडाणा :** बाप तो बाप रहेगा, हे माणसाने बोललं तर बरं आहे. एखाद्या बाईने म्हटले की मी बाप आहे तर बापासारखे शरीर कुठून आणणार आहे, असे विधान आ. संजय गायकवाड यांनी श्वेता महाले यांना उद्देशून केले होते. या वक्तव्याप्रकरणी एका महिलेने आ. संजय गायकवाडांविरोधात बुलडाणा पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जिल्ह्यातील चिखली मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्वेता महाले यांचे पती विद्याधर महाले यांचा वाढदिवस मित्रपरिवाराने बुलढाणा शहरात मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला. यावेळी एक रॅली काढण्यात आली होती. त्या रॅलीत 'बाप तो बाप रहेगा....' अशा प्रकारे गाणेही वाजवण्यात आले होते. या गाण्यावर प्रसारमाध्यमांनी आमदार संजय गायकवाड यांची प्रतिक्रिया घेतली असता संजय गायकवाड यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं होतं की, 'बाप तो बाप है हे ठीक आहे. मात्र हे विधान एखाद्या पुरुषाने केलं तर चालेल, मात्र एखाद्या बाईने म्हटलं बाप तो बाप आहे तर बापाचं शरीर आणणार कुठून....?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. हे विधान समाज माध्यमात व प्रसार माध्यमात मोठ्या प्रमाणात व्हायरल झालं होतं. दरम्यान, या विधानावर महिलांच्या लज्जेस धक्का पोहोचला असून महिलांच्या शरीर ठेवणीवर प्रहार करण्यात आला, असा आरोप करत संजय गायकवाड यांनी हे विधान हेतू पुरस्कर केल्याची तक्रार करत एका ४२ वर्षीय महिलेने आमदार संजय गायकवाड यांच्याविरुद्ध बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या तक्रारीवरून मध्यरात्री आ. संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे बुलढाणा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# विहिरीत पडून दीड वर्षांच्या बिबट्याचा मृत्यू

## पळशी बुद्रुक शिवारातील घटना; वन विभागाची धाव!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**खामगाव :** तालुक्यातील पळशी बुद्रुक शिवारातील एका शेतातील विहिरीत पडून अंदाजे एक ते दीड वर्ष वयाच्या मादी बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी, १३ सप्टेंबर रोजी उघडकीस आली.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृत बिबट्याच्या शरीरावर कोणत्याही नवीन अथवा जुन्या जखमांच्या खुणा आढळून आल्या नाहीत. पळशी बुद्रुक शिवारातील गट क्रमांक ३४४ मधील अनिल तुळशीराम बोराळे यांच्या मालकीच्या शेतातील विहिरीत बिबट पडल्याची माहिती वन विभाग, खामगाव मिळाली. त्यानंतर स्थानिक वनरक्षक, वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), खामगाव तसेच बुलढाणा येथील वन्यप्राणी बचाव पथकातील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पथकाने विहिरीची पाहणी केली असता, सुमारे सहा फूट पाणी असलेल्या विहिरीत बिबट्या मृतावस्थेत तरंगताना आढळून आला.

पथकाने तत्काळ त्याला पाण्याबाहेर काढले. तपासणी केली असता, हा अंदाजे एक ते दीड वर्ष वयाचा मादी बिबट असल्याचे स्पष्ट झाले. बिबट्याच्या शरीरावर कोणत्याही प्रकारच्या जखमेच्या खुणा आढळल्या नाहीत. त्यामुळे प्राथमिकदृष्ट्या शिकारीच्या तयारीत असताना बिबट विहिरीत पडला असण्याची शक्यता आहे.

**जिवंत तरंगत असल्याचा व्हिडिओ व्हायरल**

शेतकऱ्यांना बिबट्या विहिरीत आढळल्यानंतर तो जिवंत असल्याचे दिसून आले. यावेळी त्याचा व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला. बिबट्याला वाचविण्यासाठी विहिरीत लाकूड टाकून प्रयत्न करण्यात आले; मात्र वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल होण्यापूर्वीच बिबट्याचा मृत्यू झाला. माहिती दिल्यानंतर वन विभागाचे अधिकारी उशिरा दाखल झाल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# वाळूची विनापरवाना वाहतूक; टिप्परसह 20 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**संग्रामपूर :** वाळूची विनापरवाना वाहतूक करणाऱ्या टिपरवर बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा फाट्याजवळ करण्यात आलेल्या या कारवाईत दोन ब्रास वाळूसह टिपर, असा एकूण २० लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी एकाविरुद्ध तामगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गस्तीवर असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला वाळूची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्याआधारे पथकाने तामगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पातुर्डा फाट्याजवळ एका दुकानासमोर एमएच ५६ सी ७१७७ क्रमांकाचा टिपर थांबवून तपासणी केली. त्यावेळी टिपरमध्ये विनापरवाना दोन ब्रास वाळू आढळून आली. तपासात वाळूची चोरी करून तिची वाहतूक केली जात असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईनंतर स्थानिक गुन्हे शाखेचे गणेश पुरुषोत्तम पाटील यांनी फिर्याद दिली. त्यावरून अनिकेत महादेव इंदैरे (रा. खिरोडा, ता. संग्रामपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून धमकी; जळगाव जामोद पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** जळगाव जामोद शहरातील अल्पवयीन मुलीचा मोटारसायकलने पाठलाग करून तिला धमकी देणे, तसेच तिच्याशी गैरवर्तन केल्याच्या आरोपावरून जमील खान, रा. जळगाव जामोद याच्याविरुद्ध जळगाव जामोद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गेल्या दोन महिन्यांपासून पीडित अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला त्रास देत असल्याचा आरोप आहे. च्माझ्यासोबत बोलत जा, अन्यथा तुझ्या भावाला आणि बहिणीला ठार करून टाकीन,ज् अशी धमकी आरोपीने दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच आरोपीने पीडितेच्या वडिलांच्या मोबाईलवर संपर्क साधून व्हिडिओ कॉल केला आणि पीडितेचे फोटो पाठविण्याची मागणी केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. आरोपीने पीडितेला एकांतात भेटण्यास बोलावून तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. कोणाला काही सांगितल्यास पीडितेला व तिच्या भावंडांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही पोलिसांकडे नोंदविलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास आरोपीने पीडितेला एकांतात थांबवून तिच्याशी गैरवर्तन केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारानंतर पीडितेने घडलेला प्रकार आपल्या भावासह आई-वडिलांना सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी फिर्यादी चेतन किसन हिस्सल, वय २१ वर्षे, रा. रुपलाल नगर, जळगाव जामोद यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी कायमी गुन्हा क्रमांक ५७७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ७५, ७८, ३५१(३) तसेच बाल लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियमातील कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक गणेश कायंदे करीत आहेत. दाखल अधिकारी म्हणून मपोउपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी काम पाहिले. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी सोहन माचरे, पोलिस निरीक्षक सचिन बागुल व मपोउपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास जळगाव जामोद पोलिस करीत आहेत.

# सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी जळगाव जामोद शहरात पोलिसांचा रूट मार्च

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**जळगाव जामोद :** आगामी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, सामाजिक सलोखा कायम राहावा तसेच नागरिकांनी शांततेत व उत्साहात उत्सव साजरा करावा, यासाठी रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी जळगाव जामोद शहरात पोलिसांच्या वतीने भव्य रूट मार्च काढण्यात आला.

शहरातील प्रमुख मार्गांवरून पोलिसांचा हा रूट मार्च पार पडला. मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाल्याने शहरातील नागरिकांचे लक्ष वेधले गेले. आगामी उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था कायम राहावी तसेच सर्व समाजघटकांनी परस्पर सलोखा राखत उत्सव साजरा करावा, हा रूट मार्चचा प्रमुख उद्देश होता. या रूट मार्चमध्ये गोंदिया येथील एसआरपी पथक, ५० होमगार्ड, मलकापूर येथील आरसीबी पथक तसेच अकोला येथील नवप्रविष्ठ पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि नाशिक येथील पोलीस अधिकारी सहभागी झाले होते. त्यामुळे शहरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात असल्याचे चित्र दिसून आले तसेच यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी सोहम मच्छरे, पोलीस निरीक्षक सचिन बागुल, पोलीस उपनिरीक्षक गणेश कायंदे, अमोल पंडित, नेहा शेडगे, नागेश मोहोळ, निलेश पुंडे, सचिन राजपूत, पवार साहेब यांच्यासह विविध पथकांतील पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्सवाच्या काळात शहरातील शांतता व सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणताही अनुचित प्रकार आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा तसेच कायद्याचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले. पोलिसांच्या या रूट मार्चमुळे शहरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, आगामी उत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडण्यास निश्चितच मदत होणार आहे.

# जनगणनेत ओबीसीचा स्वतंत्र रकाना समाविष्ट करा काँग्रेस

## शिष्टमंडळाची राज्यपालांकडे मागणी

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**जळगांव जामोद :** केंद्र सरकारकडून होऊ घातलेल्या जातनिहाय जनगणनेत ओबीसी प्रवर्गाचा स्वतंत्र रकाना समाविष्ट करून प्रत्येक जातीची नोंद करण्यात यावी, अशी आग्रही मागणी काँग्रेस नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे केली. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी मुंबई येथील राजभवनात काँग्रेसचे ओबीसी विभागाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. भानुदास माळी व आ. नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या प्रमुख ओबीसी नेत्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेतली. यावेळी ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सुमारे अर्धा तास सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रा. भानुदास माळी यांनी प्रास्ताविकातून ओबीसी समाजासमोरील विविध प्रश्नांचा ऊहापोह केला. आ. नानाभाऊ पटोले यांनी ओबीसी समाजासह शेतकऱ्यांच्या विविध अडचणी राज्यपालांसमोर मांडल्या. जळगाव जामोदचे काँग्रेस ओबीसी नेते राजीव घुटे यांनी ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळताना येणाऱ्या अडचणी तसेच विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांकडे राज्यपालांचे लक्ष वेधले. यावेळी डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी एसआयआर तसेच जनगणनेमध्ये वडार समाजासह भटक्या-विमुक्त जमातींवर स्थलांतरामुळे होणाऱ्या अन्यायाचा मुद्दा मांडला. स्थलांतरित समाजघटकांची अचूक नोंद होऊन त्यांना शासकीय योजनांचा योग्य लाभ मिळावा, यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. बैठकीत ओबीसींची जातनिहाय जनगणना, स्वतंत्र ओबीसी रकाना, शिष्यवृत्ती, नोकरभरती, पदोन्नती, विद्यार्थ्यांचे प्रश्न तसेच ओबीसी समाजाच्या विविध हक्कांशी संबंधित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. या शिष्टमंडळात किशोर कान्हेरे, विजय राऊत, विमल कटरे, अनंत मोहोळ, जीवन चाकणकर, धनराज राठोड, मंगल भुजबळ, दिगंबर राऊत, तुषार पेंढारकर, उमाकांत धांडे, विनोद अहिरकर, शैलेश राऊत, अशोक खलाने, ॲड. शुभांगी शेरेकर यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेले एकूण ३२ प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे, बुलढाणा जिल्ह्यातून काँग्रेसचे ओबीसी नेते राजीव घुटे हे एकमेव प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते. त्यामुळे जिल्ह्यातील ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांना राज्यपालांसमोर मांडण्याची महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी बजावली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com





बाप्पा आले








# लाडक्या बाप्पाचे हर्षोल्हासात आगमन

## डीजे-ढोल ताशांवर थिरकले लहान थोर, गणपती बाप्पाचा सर्वत्र जल्लोष

प्रतिनिधी १४ सप्टेंबर




**अकोला :** विद्येची देवता श्री गणेशाची घरोघरी मंगलमय व भक्तीपूर्ण वातावरणात स्थापना करण्यात येते. यासाठी सोमवारी सकाळपासूनच गणरायाला घरी आणण्यासाठी बालगोपालांसह सर्वांचाच उत्साह शिगेला पोहोचला होता. सकाळपासूनच बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी करण्यात येऊ बाप्पाला आणण्यासाठी सर्व जण आतूर झाले होते.

आज बाजारपेठे आनंदी आनंद ओसंडून वाहत होता. चौकाचौकात पूजा साहित्य, डेकोरेशन, रोषणाईची व गणेश मूर्तीची दुकाने सजली होती. गणेशमूर्ती आणण्यासाठी सहकुटुंब बाहेर निघत असल्याने संपूर्ण बाजारात चैतन्य पसरले होते. डोक्याला 'गणपती बाप्पा मोरया'च्या पट्ट्या समोर वाजंत्री वाले अशा थाटात गणरायाला भक्त घरी घेऊन जात होते. तर गल्लीतील मंडळी ढोल, ताशे, डीजेच्या तालावर गणपतीचा जयघोष करीत जल्लोषात नृत्य करीत होते. एकूणच सर्वत्र उत्साह ओसंडून वाहत होता. जिकडे तिकडे 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने दुमदुमत होता.

# नवीन गॅस कनेक्शन मिळत नसल्याने नवदांपत्याचा संसार इंडक्शन चुलीवर



## नवीन कनेक्शन साठी अर्जाचा ढिग

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला:** मार्च महिन्यात भडकलेल्या आखाती युद्धानंतर प्रमुख गॅस कंपन्यांनी नवीन कनेक्शन देणे मार्चपासूनच बंद केले आहे. त्यामुळे नवीन लग्न झालेल्या जोडप्यांची, तसेच शहरात कामानिमित्त स्थलांतरित झालेल्या कुटुंबांची मोठी कोंडी झाली आहे. त्यामुळे संसार सुरू केला पण चूल कशी पेटवायची? असा प्रश्न अनेकांसमोर उभा राहिला आहे. आखाती युद्धानंतर केवळ जुन्या ग्राहकांना पुरवठा सुरळीत ठेवण्याचे धोरण आखून नवीन गॅस कनेक्शन देण्याची प्रक्रिया तातडीने बंद करण्यात आली. त्यामुळे शहरातील गॅस एजन्सी मध्ये नवीन गॅस कनेक्शन साठी आलेल्या हजारो अर्जांचा ढीग साचला असून, नागरिक रोज नवीन गॅस कनेक्शन साठी चकरा मारून थकले आहेत. नवीन कनेक्शन मिळत नसल्यामुळे नाईलाजाने अनेक कुटुंबांना दुप्पट दराने व्यावसायिक सिलेंडर खरेदी करावे लागत आहे. तर काहींनी इंडक्शन शेगडी चा पर्याय निवडला पण त्यांना वीज भारनियमनाचा तसेच वाढीव बिलाचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण परिसरात तर चूल पेटवण्याची वेळ नागरिकांवर आली आहे

**नवीन कोटा मंजूर झाल्यानंतर मिळेल नवीन गॅस कनेक्शन**

मार्च महिन्यापासून गॅस पुरवठा विस्कळीत झाला आहे वरिष्ठ पातळीवरूनच नवीन गॅस कनेक्शन देण्याच्या प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे नागरिकांना वरिष्ठ स्तरावरून येणाऱ्या नवीन सूचना तसेच गॅसचा कोटा मंजूर होईल त्यानुसार नवीन कनेक्शन देण्याची कार्यवाही सुरू केली जाईल

पुरवठा विभाग

## पोपटखेड धरणात युवकाचा मृत देह आढळला

**अकोट :** अकोट तालुक्यातील पोपटखेड धरणात एका युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. अक्षय विश्वासराव अरबट (वय ३२, रा. देवर्डा) असे मृत युवकाचे नाव आहे.माहिती मिळताच पोपटखेड येथील वीर एकलव्य बचाव पथकाने धरण परिसरात शोधमोहीम राबवून युवकाचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह ग्रामीण रुग्णालय, अकोट येथे पाठविण्यात आला. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शवविच्छेदन अहवालानंतर याबाबत माहिती समोर येणार आहे.

# महावितरणच्या तार चोरीचे मुर्तीजापुर कनेक्शन?

प्रतिनिधी १४ सप्टेंबर

**अकोला :** महावितरणच्या मोठ्या विद्युत खांबांवरील लाखो रुपयांच्या ॲल्युमिनियम तारांची चोरी करणाऱ्या टोळीला माना पोलिसांनी अटक केल्यानंतर या प्रकरणाचे धागेदोरे आता मुर्तीजापूरपर्यंत पोहोचल्याची चर्चा सुरू झाली आहे. चोरी केलेल्या ॲल्युमिनियम तारांची खरेदी-विक्री अथवा 'कलेक्शन' करणारी व्यक्ती मुर्तीजापूर येथील असल्याचे बोलले जात असून, संबंधित व्यक्तीचे नाव पोलिसांच्या तपासात समोर आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.माना पोलिसांनी विद्युत तार चोरी करणाऱ्या टोळीवर कारवाई केल्यानंतर या टोळीने चोरी केलेला माल नेमका कुठे आणि कोणाला विकला, याचा तपास सुरू केला आहे. याच तपासादरम्यान मुर्तीजापूरशी संबंधित काही धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची चर्चा आहे.

**चोरीचा माल नेमका कुठे जात होता?**

महावितरणच्या विद्युत खांबांवरील तार चोरीमुळे केवळ शासनाचे आर्थिक नुकसान होत नाही, तर अनेक भागांतील वीजपुरवठ्यावरही परिणाम होतो. त्यामुळे या टोळीमागे केवळ चोरांचा सहभाग आहे की चोरीचा माल खरेदी करणारे आणि पुढे त्याची विल्हेवाट लावणारे मोठे जाळे कार्यरत आहे, याचा तपास होणे गरजेचे आहे. माना पोलिसांच्या कारवाईनंतर आता या चोरीच्या मालाचे मुर्तीजापूर कनेक्शन कितपत खोल आहे, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. संबंधित व्यक्तीची चौकशी झाल्यानंतर या प्रकरणातील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे

# पुलावर शहरवासीयांनी अनुभवला थरार!

प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**बाळापूर :** बाळापूर शहरातून जाणाऱ्या मार्गावरील भीमकुंड नदीवर अरूंद पूल आहे. या पुलावरून मोठे वाहन एकावेळी एकच जाऊ शकते. अशा अवस्थेत एक ट्रक समोर असताना दुसऱ्याने त्याला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यामुळे दुसरा ट्रक पुलाच्या खाली कोसळण्यापासून थोडक्यात वाचला अन्यथा मोठा अनर्थ झाला असता. ट्रकचे चाके पुलावरील संरक्षक कठडे तोडून पुलाच्या बाहेर आले होते. हा थरार या मार्गावरून वाहतूक करणाऱ्यांसह शहरवासीयांनी अनुभवला.बाळापूर भीमकुंड नदीच्या काठावर दोन ट्रॅक एकमेकांना पास करतांना एका ट्रकने नदीच्या पुलावरील कठडे तुटल्याने चाके पुलाच्या बाहेर हवेत तरंगली.

उमलत्या कळ्या

दुसरा वाढदिवस



भावेश शिरीषकुमार बियाणी

# अकोट तालुक्यातील पोपटखेड धरणाचे दोन दरवाजे उघडले!

## नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

वि.प्रतिनिधी १४ सप्टेंबर



**अकोट :** सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या अकोट तालुक्यातील पोपटखेड प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील जलसाठ्यात वाढ झाली आहे. यामुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रविवारी (ता. १३) दुपारी ३ वाजता प्रकल्पाचे दरवाजा क्रमांक १ व ४ प्रत्येकी २ सेंटीमीटरने उघडण्यात आले. या दोन दरवाज्यांतून एकूण ९५.४२ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. शनिवारी मध्यरात्रीनंतर आणि रविवारी पहाटेपासून सातपुडा पर्वतरांगांच्या परिसरात पावसाचा जोर वाढला. परिणामी पोपटखेड धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू झाली. धरणातील जलपातळी वाढत असल्याने जलसंपदा विभागाने परिस्थितीचा आढावा घेत सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा भाग म्हणून दोन दरवाजे उघडण्याचा निर्णय घेतला. धरण प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सध्या नदीपात्रात ९५.४२ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू असून पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार या विसर्गाच्या प्रमाणात आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट केली जाऊ शकते. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणातील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने जलसंपदा विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. तसेच कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये सुरू असलेल्या दमदार पावसामुळे अकोट तालुक्यातील नद्या, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीतही वाढ होत आहे. त्यामुळे शेतकरी, नागरिक तसेच नदीपात्रालगत राहणाऱ्या ग्रामस्थांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

बाप्पा आले









हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135